७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## रायगडच्या राजकारणात अनपेक्षित घडामोडी

रायगड (दै. संध्या) : रायगड जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेवरून महायुतीत तिढा वाढल्याचे पाहायला मिळालं होतं. भाजप आणि राष्ट्रवादीने शिंदे गटाला बाजूला ठेवून सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न सुरु केले होते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या नेत्यांमध्ये गुरुवारी बैठक झाली. त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीतील वादावर पडदा पडल्याचे समोर आलं आहे. परंतु शिंदे गट आणि भाजपमधील पालकमंत्रिपदाचा तिढा कायम असल्याचे पाहायला मिळत आहे. रायगड जिल्हा परिषदेतील शिवसेना राष्ट्रवादीतील वादावर पडदा पडला असून रायगड जिल्हा परिषदेत भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्र आले आहेत. जिल्हा परिषदेतील वादावर पडदा पडला. आता रायगडच्या पालकमंत्री पदाचं काय असा प्रश्न, प्रलंबित आहे. यावरून राष्ट्रवादीच्या मंत्री आदिती तटकरे आणि शिवसेनेचे जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले यांनी पुन्हा एकदा वरिष्ठांकडे बोट दाखवले आहे.

# कसब्यातील जुने प्रतिस्पर्धी एकत्र; रोहित टिळक सत्तेत?

मुंबई (दै. संध्या)

स्वातंत्र्यपूर्व काळापासून टिळक घराण्याचे काँग्रेसशी जवळचे संबंध राहिले आहेत. लोकमान्य टिळक मूळचे काँग्रेसचे नेते होते, तर स्वर्गीय जयंतराव टिळक यांनी काँग्रेसचे खासदार आणि विधानपरिषदेचे सभापती म्हणून काम पाहिले. रोहित टिळक यांनी 2009 आणि 2014 मध्ये कसबा विधानसभा निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर लढवली असून ते प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीसही राहिले आहेत. टिळक ट्रस्टकडून कर्तृत्वाच्या आधारे दिला जाणारा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिल्यानंतर काँग्रेस नेतृत्वाने दुरावा ठेवल्याचे रोहित टिळक यांनी सांगितले. इंदिरा गांधी आणि प्रणव मुखर्जी यांनाही हा सन्मान देण्यात आला होता. मात्र आता यामुळे काँग्रेसचे काम थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे रोहित टिळक यांनी स्पष्ट केले. लोकमान्य टिळकांचे खापरपणतू रोहित टिळक यांनी काँग्रेस पक्षाला रामराम करत शिवसेना



एकनाथ शिंदे पक्षामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कसबा विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांमध्येही मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यासाठी ही घडामोड राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

रोहित टिळक यांनी काँग्रेस पक्ष सोडण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर या निर्णयामागील कारणांबाबतही चर्चा रंगू लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यात आल्यापासून काँग्रेस नेतृत्व आणि रोहित टिळक यांच्यात मतभेद वाढल्याचे सांगितले जाते. त्यानंतर राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाकडून टिळक यांच्याशी संपर्क साधण्यात आल्याची चर्चा होती. या घडामोडींमुळे काँग्रेस हायकमांड आणि टिळक यांच्यातील अंतर वाढत गेले आणि अखेर त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघात रोहित टिळक आणि रवींद्र धंगेकर हे पूर्वी राजकीय प्रतिस्पर्धी राहिले आहेत. 2014 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून रोहित टिळक तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून धंगेकर मैदानात उतरले होते. त्या निवडणुकीत भाजपचे दिवंगत आमदार गिरीश बापट विजयी झाले होते. त्या वेळी टिळक यांना सुमारे 31 हजार तर धंगेकर यांना सुमारे 26 हजार मते मिळाली होती. आता हे दोन्ही नेते एकाच पक्षात येण्याची शक्यता असल्याने कसब्यातील राजकारणाला नवे वळण मिळण्याची चर्चा सुरू झाली आहे. रवींद्र धंगेकर यांचा राजकीय प्रवासही अलीकडच्या काळात चर्चेत राहिला आहे. त्यांनी काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याविरोधात जोरदार लढत दिली होती. मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे हेमंत रासने यांनी त्यांचा पराभव केला. या काळात काँग्रेसमधील स्थानिक नेत्यांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याची भावना व्यक्त करत धंगेकर यांनी काँग्रेसला रामराम केला आणि शिवसेनेमध्ये प्रवेश केला. सध्या ते शिवसेनेचे पुणे महानगरप्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

### कसबा मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलणार

महापालिका निवडणुकीत धंगेकर यांनी आपल्या पत्नी प्रतिभा आणि मुलगा प्रणव यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून भाजपविरोधात जोरदार लढत दिली होती. मात्र या दोघांनाही पराभवाचा सामना करावा लागला. तरीही धंगेकर यांनी कोथरुड परिसरातील गुन्हेगारी आणि जैन बोर्डिंग प्रकरणावरून अनेकदा भाजप नेत्यांवर टीका केली होती. त्यांनी मुरलीधर मोहोळ तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावरही उघडपणे आरोप केले होते. सभागृह नेते गणेश बीडकर यांच्याशीही त्यांचे राजकीय मतभेद कायम राहिले आहेत. आता रोहित टिळक यांच्या प्रवेशामुळे कसबा मतदारसंघातील राजकीय समीकरणे पुन्हा बदलू शकतात आणि त्याचा परिणाम धंगेकर यांच्या राजकीय भूमिकेवरही होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## जगातील पहिले 'वैश्विक मराठी भाषा केंद्र' उभारणार : मंत्री उदय सामंत

मुंबई (दै. संध्या)

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर आता या भाषेचा गौरव जागतिक स्तरावर नेण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. मुंबईतील 'मराठी भाषा भवन' आणि ऐरोलीतील उपकेंद्रासोबतच आता लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने जगातील पहिले वैश्विक मराठी भाषा केंद्र उभारण्यात येणार असल्याची ऐतिहासिक घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत केली. विधान परिषदेत सदस्य भाई जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सामंत म्हणाले की, मुंबईतील धोबी तलाव येथील 'मराठी भाषा भवन'चे काम तांत्रिक कारणांमुळे



लांबणीवर पडले होते. मात्र, आता १०० कोटींच्या निधीसह हे काम वेगाने सुरू असून, फेब्रुवारी २०२७ पर्यंत या भवनाच्या काही भागाचे लोकार्पण केले जाईल. मराठी भाषेला मिळालेला 'अभिजात' दर्जा हा केवळ कागदावर नसून, तिच्या संवर्धन आणि प्रसारासाठी राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

## काम नाही तर नावाला नवनिर्माण कशासाठी?

*मनसे पदाधिकाऱ्यांवर राज ठाकरे संतापले; म्हणाले- सगळ्या गोष्टींचा मजाक बनवलाय*

मुंबई (दै. संध्या)

राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पश्चिम उपनगरातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. दहिसर ते वांद्रे या परिसरातील विविध विधानसभा मतदारसंघांतील पदाधिकारी या बैठकीसाठी उपस्थित होते. गोरेगाव पश्चिम येथील एम्पायर बँक्वेट हॉलमध्ये ही बैठक आयोजित करण्यात आली होती. महिला विभाग, शाखा तसेच उपशाखा स्तरावरील पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र या बैठकीदरम्यान राज ठाकरे यांनी काही पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त करत त्यांना



कडक शब्दांत सुनावल्याची माहिती समोर आली आहे. बैठकीत बोलताना राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना थेट इशारा दिला. तुम्ही खाली काय करता याची मला पूर्ण माहिती मिळते. कोण काय काम करतंय आणि कोण निष्क्रिय आहे, हे सगळं माझ्यापर्यंत पोहोचत असतं. आता मला प्रत्येकाने नेमकं काय काम केलं हे पाहायचं आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितल्याचे समजते. पक्षाच्या कामकाजात शिथिलता दिसून येत असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. सगळ्या गोष्टींचा मजाक बनवला आहे. जर काही नवीन करायचं नसेल, तर पक्षाच्या नावात असलेल्या 'नवनिर्माण'चा अर्थ तरी काय? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे यांनी बैठकीत सदस्य नोंदणीच्या कामाचाही आढावा घेतला. पक्षाच्या संघटनात्मक कामात कोण किती सक्रिय आहे, याची आकडेवारी लवकरच समोर येईल, असे त्यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. तसेच येत्या 19 तारखेला पक्षाच्या पुढील कार्यक्रमासाठी तयारी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. पदाधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर जनसंपर्क वाढवावा आणि पक्षाच्या कामात अधिक सक्रिय व्हावे, असे निर्देशही त्यांनी दिल्याचे समजते. या बैठकीत महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनाही राज ठाकरे यांनी काही प्रश्न उपस्थित केले. तुम्ही फक्त हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित करता, पण महिलांसाठी त्यापलीकडे कोणते नवे उपक्रम राबवता? असा थेट सवाल त्यांनी केल्याची माहिती आहे. महिलांसाठी समाजाभिमुख उपक्रम राबविण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. पक्षाचे काम केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता समाजात सक्रिय भूमिका घ्यावी, असे त्यांनी सुचवले.

## देश संकटात आणि पंतप्रधान प्रचारात व्यस्त : मोदींना जगात मान उरलेला नाही

*गृहखाते केवळ फोडाफोडीत मग्न, मुंबई सुरक्षित नाही : संजय राऊत*

मुंबई (दै. संध्या)

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या केरळमध्ये, तामिळनाडूमध्ये निवडणुकीचा प्रचार करत आहेत. देशात जो गंभीर प्रसंग ओढवला आहे, पेट्रोल, डिझेल, तेल संकट LPG चा तुटवडा यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वक्तव्य केले नाही. हे केवळ निवडणुकीसाठी निवडणुका जिंकण्यासाठी सरकारी तिजोरीतून अमाप खर्च करत आहेत. हे संवेदनशुन्य पंतप्रधान आम्हाला लाभले हे देशाचे दुर्दैव आहे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, नागरिकांनी सिलिंडर नाही म्हणून काही घाबरण्याची गरज नाही. भाजपचा जो जय श्री राम मंत्र आहे तो म्हणायचा आणि लगेच घरी सिलिंडर येतील. नमो-नमो



म्हटले की सिलिंडर घरपोच येतील. पेट्रोल-डिझेलसुद्धा तुमच्या दारात येईल. इतक्या स्तरावर आपल्या देशात अंधभक्ती आहे. प्रमुख प्रश्नांची चिंता कुणाला वाटत नाही.


संजय राऊत म्हणाले की, आपल्या देशाचे काही परराष्ट्र धोरण नाही. नरेंद्र मोदी यांना जगामध्ये कोणताही मान आणि प्रतिष्ठा राहिलेली नाही. एकेकाळी जगामध्ये भारताच्या भूमिकेला फार महत्त्व होते, पण मोदी आल्यापासून जगात ते महत्त्व राहिले नाही. इराण युद्धाबद्दल भारताची भूमिका असायला हवी होती. पण युद्धाच्या एक दिवस आधी मोदी इस्रायलला जातात आणि त्यानंतर काही तासांमध्ये इराणच्या नेत्याची हत्या केली जाते त्यावर साधा निषेध नोंदवला जात नाही. म्हणजे कुणीतरी पंतप्रधान कुणाच्यातरी दबावाखाली आहेत.

संजय राऊत म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला ही खूप मोठी समस्या आहे असे वाटत नाही. त्यांना आसाम, केरळ, तामिळनाडूमध्ये निवडणूक जिंकणे महत्त्वाचे वाटत आहे. LPG चा तुटवडा,हॉटेल बंद होतायत याबाबत चिंता नाही, हे बंद पडत असल्याने वाढणारी बेरोजगारी याबद्दल सरकारला काहीही चिंता नाहीच. संजय राऊत म्हणाले की, विधीमंडळात बॉम्बची अफवा हे गृहमंत्र्यांसाठी आव्हान आहे. मुंबई सुरक्षित नाही असा याचा अर्थ आहे. महाराष्ट्राचे गृहखाते, पोलिस दल हे केवळ विरोधकांमध्ये फोडाफोडी करण्यासाठी आणि दहशत निर्माण करण्यासाठी वापरले जात आहे. यामुळे गुन्हेगारांना दहशतवाद्यांना असे वाटत आहे की आपण काहीही केले तरी पोलिसांचे हात आपल्यापर्यंत पोहोचणार नाही. ही केवळ अफवाच ठरावी. आमदार तिथे असताना अशा अफवा पसरू नये. संसदेवर हल्ला झाला तेव्हाही भाजप सरकार होते, ते आम्ही डोळ्यांनी पाहिले आहे. हे दुर्दैवाने सांगावे लागत आहे.

## धमकीचा ई-मेल 'फेक' असल्याचा प्राथमिक अंदाज - योगेश कदम

मुंबई (दै. संध्या)

आज सकाळी मुंबईत एका निनावी ई-मेलमुळे मोठी खळबळ उडाली. विधानभवनासह मुंबईतील चार महत्त्वाच्या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी हा मेल प्राप्त झाला, ज्यामध्ये स्फोट घडवून आणण्याची वेळही नमूद करण्यात आली होती. या घटनेनंतर राज्यमंत्री योगेश कदम आणि गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत परिस्थिती स्पष्ट केली आणि जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहन केले. राज्यमंत्री योगेश कदम यांनी या घटनेची पुष्टी करताना सांगितले की, "विधीमंडळ बॉम्बने उडवून देऊ असा ई-मेल आला होता, ही वस्तुस्थिती



■ देश सुरक्षित हातात, अफवांवर विश्वास ठेवू नका

आहे. मात्र, प्राथमिक तपासात हा एक 'हॉक्स' (खोटी धमकी) ई-मेल असल्याचे दिसून येत आहे. अनेकदा अशा प्रकारे ई-मेल पाठवून प्रशासनाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला जातो."


# विरोधकांना कमी लेखू नका : विधिमंडळातील गैरहजेरीवर भाजपचा इशारा

### दांडीबहाद्दर आमदारांना चव्हाणांचा दम

मुंबई (दै. संध्या)

भाजपच्या आमदार आणि मंत्र्यांच्या विधीमंडळातील वाढत्या गैरहजेरीवरून पक्षाने आता कडक भूमिका घेतली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत आमदार आणि मंत्र्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिल्याची माहिती समोर आली आहे. विरोधकांना कमी लेखून निष्काळजीपणे वागू नका आणि सभागृहातील कामकाज गांभीर्याने घ्या, असा संदेश त्यांनी दिला आहे. तसेच विधिमंडळात वारंवार गैरहजर राहणाऱ्या सदस्यांचे रिपोर्ट कार्ड तयार करून ते संबंधितांच्या हातात देण्यात आल्याचीही माहिती आहे.

यापुढे कोणताही आमदार किंवा मंत्री सभागृहात अनुपस्थित राहणार असेल, तर त्याला त्याचे लेखी कारण पक्षाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. विनाकारण गैरहजर राहणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. पक्षाच्या सूत्रांनुसार, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून मंत्र्यांच्या उपस्थितीवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे आमदार आणि मंत्र्यांना



आता सभागृहातील कामकाजाकडे अधिक गांभीर्याने पाहावे लागणार आहे. भाजपने यासाठी नवीन पद्धत लागू केली आहे. सभागृहाचे कामकाज सकाळी सुरू झाल्यापासून सायंकाळपर्यंत सर्व आमदार आणि मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक असेल. यासाठी पाच आमदारांचा एक गट तयार करण्यात आला आहे. त्या गटातील एका आमदाराकडे उपस्थिती आणि कामकाजात सहभाग याची जबाबदारी देण्यात आली आहे. संबंधित आमदार आपल्या गटातील सदस्य सभागृहात किती वेळ उपस्थित राहतात आणि कितपत सक्रिय असतात याचा अहवाल थेट प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याकडे देणार आहे. दरम्यान, जर एखाद्या आमदार किंवा मंत्र्याला महत्त्वाच्या बैठकीसाठी किंवा अन्य कारणासाठी सभागृहातून अनुपस्थित राहावे लागले, तर त्याबाबत योग्य आणि लेखी कारण पक्षाला कळवावे लागेल. कोणतीही माहिती न देता अनुपस्थित राहिल्यास संबंधित आमदारावर पक्षाकडून कारवाई होणार आहे. तसेच मंत्र्यांच्या बाबतीत संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील योग्य ती कार्यवाही करतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. भाजपने घेतलेल्या या कठोर निर्णयामुळे आता विधिमंडळातील उपस्थितीबाबत आमदार-मंत्र्यांवर अधिक जबाबदारी येणार असल्याचे मानले जात आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## पुणे ते शिरूर आता फक्त काही मिनिटांत

पुणे (दै. संध्या) : शहरातील वाढत्या वाहतूककोंडीवर उपाय म्हणून केंद्र सरकारकडून मोठ्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. एकूण सुमारे 45,000 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत माहिती देताना पुण्यातील अनेक महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना गती देण्यात येणार असल्याचे सांगितले. या योजनेंतर्गत पुणे ते अहिल्यानगर महामार्गावर मोठा उन्नत मार्ग उभारण्याचा प्रस्ताव आहे. पुणे-नगर महामार्गावर सुमारे 53.4 किमी लांबीचा उन्नत मार्ग विकसित केला जाणार असून या प्रकल्पासाठी सुमारे 7,514 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या मार्गावर सुमारे 31 किमी लांबीचा उड्डाणपूल असणार असून तो देशातील सर्वात लांब उड्डाणपूल मानला जाणार आहे. हा सहा पदरी उड्डाणपूल खराडी जंक्शन ते रांजणगाव एमआयडीसीपर्यंत असणार आहे.

## जीव वाचवण्यासाठी कुऱ्हाडीचा वापर करा

पुणे (दै. संध्या) : 'जर आपल्यावर कोणी हल्ला करत असेल तर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हातातील कुऱ्हाडीचा वापर करा', असं चिथावणीखोर आवाहन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे. महाराष्ट्रात मेंढपाळांवर वारंवार होत असलेल्या हल्ल्यांबाबत संताप व्यक्त करत लक्ष्मण हाके यांनी धनगर समाज बांधवांना असं आवाहन केले आहे. बीडच्या माजलगावमध्ये त्यांनी हे विधान केले असून यामुळे चर्चांना उधाण आले आहे. लक्ष्मण हाके यांनी सांगितले की, 'राज्यात कायद्याचे राज्य आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. मेंढपाळांवर हल्ल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. कोणी जर आपल्यावर हल्ला करत असेल तर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हातातील कुऱ्हाडीचा वापर करा. मी चिथावणी देत नाही तर जबाबदारीने बोलत आहे.

## भाजप प्रदेशाध्यक्षांच्या मुलीचं निधन

पुणे (दै. संध्या) : मध्यप्रदेशचे भाजप प्रदेशाध्यक्ष आणि बैतुलचे आमदार हेमंत खंडेलवाल यांच्या मुलीचे बुधवारी दुखःद निधन झाले आहे. सुरभि खंडेलवाल यांचे बैतुल या शहरात निधन झाले आहे. त्या 34 वर्षांच्या होत्या. डॉक्टरांनी सांगितले की हार्ट अॅटॅकमुळे तिचा मृत्यू झाला आहे. ही निधनवार्ता समजताच कुटुंबासह पक्षात शोककळा पसरली आहे. हेमंत खंडेलवाल यांच्या निवासस्थानी मोठ्या संख्येने नातेवाईक आणि पक्षाच्या कार्यकर्ते जमा झाले होते. सुरभि खंडेलवाल यांचे बैतुलमध्ये अंत्यविधी पार पडला. मुख्यमंत्री मोहन यादव, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण आणि ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासह अनेक नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, आमदार हेमंत खंडेलवाल यांच्या मुलीचे हृदयविकारच्या झटक्याने निधन झाले. त्या बुधवारी सकाळी 11.30 वाजता फिजिओथेरपी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यानंतर त्यांची अचानक प्रकृती खालावली आणि श्वास घ्यायला त्रास होऊ लागला.

## संपादकीय

# पुस्तकांची ताटकळ

जगभरात पुस्तकमैत्री वाढते आहे. सरकारनेही चार वर्षांपूर्वी पुस्तकांच्या नव्या गावांची घोषणा केली. त्याचे वर्तमान तपासायला हवे. नव्या पिढीत पुस्तकभान वाढविण्यासाठी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना ४० टक्के वाढीव अनुदान दिले जाणार आहे. नव्या दोन हजार ग्रंथालयांना मान्यता मिळणार आहे. दीडशे वर्षे झालेल्या वाचनालयांचा राज्य सरकार गौरव करणार आहे. पुस्तकांबद्दलच्या जाणिवा अशा समृद्ध व्हायला हव्यात. मध्यंतरी राज्य सरकारने पुस्तकांच्या नव्या गावांची घोषणा केली होती. त्याचा ताळेबंदही या निमित्ताने घ्यायला हवा. नाहीतर पुढे पाठ मागे सपाट असे होईल. पुस्तकांचे मोल वाचल्याखेरीज कळत नाही. अलीकडे पुस्तकांची गावे दिसू लागली असली तरी, या काळाच्या किती तरी आधी भारतात पुस्तकांबद्दलची जाणीवजागृती झाली होती. पुस्तकांच्या चळवळीचे प्रवर्तक महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रयत्नांमुळे बडोद्यात सक्तीच्या शिक्षणाशी ग्रंथालयांना जोडण्यात आले. बडोदा हे खऱ्या अर्थाने पुस्तकी चळवळीचे उगमस्थान होते. पुस्तकांसाठी अमेरिकेतील 'ओपन ॲक्सेस सिस्टीम' तेव्हा बडोद्यात होती. १९२७-२८ या अवघ्या एका वर्षात तेथील मध्यवर्ती ग्रंथालयातून एक लाख पुस्तकांची देवाणघेवाण झाली. त्या काळात ग्रंथालयावरील खर्चाची प्रस्तावित तरतूद आजच्या काळाच्या दृष्टीने २६ कोटी ११ लाख रुपयांहून अधिक होती. फिरत्या ग्रंथालयांची व्याप्ती महाराजांनी स्मशानापर्यंत पोहचविली. त्यांनी पुस्तक चळवळीला बडोद्यापुरते मर्यादित न ठेवता ग्रंथालयांद्वारे संपूर्ण भारतात त्याचा प्रसार केला, असे प्रशंसोद्गार 'ब्रिटिश जर्नल ऑफ लायब्ररी सायन्स'मध्ये आहेत. ग्रेट ब्रिटनच्या वेल्समधील हे-ऑन-वाय शहर जगातील पहिले 'बुक टाऊन' म्हणून ओळखले जाते. रिचर्ड बूथ या अफलातून ग्रंथवेड्याने अधोगतीकडे जाणाऱ्या शहरातील बाजारपेठेला १९६१मध्ये जुन्या आणि जुन्या पुस्तकांच्या खरेदी-विक्रीचे केंद्र बनविले. शहराला प्रसिद्धीच्या झोतात आणण्यासाठी बूथ यांनी स्वत:ला राजा म्हणवून घेत १९७७ मध्ये हे-ऑन-वाय हे स्वतंत्र राज्य असल्याची घोषणा केली. गमतीशीर बाब म्हणजे त्यांनी स्वत:च्या घोड्याला पंतप्रधान नेमले. गावाची लोकसंख्या आहे, दोन हजाराहून कमी. तिथे पुस्तकांची दुकाने आहेत २०! कॅसल येथे एक खुले, प्रामाणिक पुस्तक दालन आहे. तिथे कुणीही विक्रेता नाही. लोक पेटीत पैसे टाकून पुस्तके खरेदी करतात. त्यानंतर बेल्जियममधील रेडू, स्कॉटलंडमधील विगटाउन यांसारखी पुस्तकगावे निर्माण झाली. जगात दर सेकंदाला सुमारे ७० पुस्तके विकली जातात. नेमका हिशेब नसला तरी ऑनलाइनसह सर्व माध्यमांनी वर्षभरात विकलेली पुस्तके अंदाजे २०० ते २२० कोटी असू शकतात. अमेरिका, चीन आणि ब्रिटनमध्ये जगभरातील सत्तर टक्के पुस्तकांची विक्री होते. न्यूयॉर्कमधील 'बार्न्स अँड नोबल' हे जगातील सर्वांत मोठे पुस्तकांचे दुकान आहे. कोलकात्याचा 'कॉलेज स्ट्रीट' हा आशियातील सर्वांत मोठा पुस्तक बाजार आहे. सर्वाधिक पुस्तके दिल्लीत विकली जातात. पुस्तकांच्या नि:शुल्क सेवाही प्रभावी आहेत. सातारा जिल्ह्यातील भिलारने भारतातील पहिले पुस्तकाचे गाव म्हणून लौकिक कमावला. भिलार स्ट्रॉबेरीसाठीही प्रसिद्ध आहे. तिथे ३५ दालनांसह ३५ हजारांहून अधिक पुस्तके पर्यटक मोफत वाचू शकतात. सरकारने सांगलीजवळील औदुंबर, मराठवाड्यातील वेरूळ, विदर्भातील नवेगाव बांध आणि कोकणातील पोंभुर्ले या नव्या पुस्तक गावांची घोषणा चार वर्षांपूर्वी केली. पहिले दालन सुसज्ज असताना नवेगाव फाउंडेशन उद्घाटनासाठी पत्रव्यवहार करून कंटाळले. दीड वर्षांपूर्वी अधिकाऱ्यांची पाहणी तेवढी आटोपली. मंत्री, अधिकाऱ्यांनी पुस्तकांच्या वाट्याला ताटकळ आणली आहे. साने गुरुजी पुस्तकांना प्रेम, त्याग आणि मांगल्याची पेरणी करणारी शिदोरी मानायचे. मानवी जीवनाला प्रगल्भ करणारी जिवंत मैत्रीण म्हणजे पुस्तक असे त्यांचे मत होते. नवेगाव बांध हे विदर्भातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. अशा स्थळी 'निष्ठावान मैत्रिणीं'ची घुसमट योग्य नाही. रुक्ष सरकारला कुणी तरी हे सांगायला हवे.

## संस्कृत सुभाषित

अभिवादन शीलस्य नित्य वृद्धोपसेविन:
चत्वारि संप्रवर्धन्ते कीर्तिरायुर्यशो बलम्।।
(उद्योगपर्व, अध्याय ३९, श्लोक ७६ महाभारत)
अर्थ – नेहमी अनुभवी वृद्धांना वंदन करून त्यांच्या सहवासात जो राहतो त्याची कीर्ती, आयुष्य, यश व सामर्थ्य ही चार अंगे वृद्धिंगत होतात.

## गुरु वचन

### खरा धर्म, संसाराची सेवा करणे

एकदा एक गुरू आपल्या काही शिष्यासोबत मेळ्यात गेले. त्यांनी पाहिले की, एका जागेवर बसून काही बाबा माळा फेरत होते. त्यांनी आपल्या समोर एक चादर अंथरलेली होती ज्यावर येणारे–जाणारे लोक पैसे टाकत होते. साधु डोळे बंद करून बसले होते जसे ध्यानात मग्न आहे. परंतु मधुन–मधुन ते थोड्यावेळेसाठी डोळे उघडून समोर अंथरलेल्या चादरीवर पाहत होते की, त्यावर किती पैसे जमा झाले. साधु असे करत होते हे पाहुन गुरू हसले. त्यांनी शिष्यांना पुढे चालण्यास सांगितले. पुढे एक तपस्वी शिर्षासन करत होते. तेथे खूप गर्दी जमा झाली होती. त्याला पाहून गुरूने जोरजोरात हसणे सुरू केले. पुन्हा ते आपल्या शिष्यांना घेऊन पुढे निघाले. पुढे एक पंडीत भगवत कथा सांगत होते. त्यांच्या समोर चेल्यांची मंडळी बसलेली होती. अधुन–मधुन जयकार लावुन आणि कीर्तन देखील करत होते. पुन्हा–पुन्हा कथाचे आयोजक लोकांना श्रद्धा–भक्तिपूर्वक दान देण्याचे निवेदन करत होते. कथाचे कार्यकर्ता दानपात्र घेऊन श्रोतांमध्ये फिरत होते आणि कथा ऐकणारे भक्त त्या पात्रात काही ना काही टाकत असे. त्याला पाहून गुरू पुन्हा खीळखीळून हसले.

त्याच्या पुढे एका चिकित्सा शिबिरात एक चिकित्सक रूग्णांच्या सेवेत लागलेला होता. गुरू काही वेळेपर्यंत तेथे थांबले. त्यांच्या डोळ्यात आश्रू आले. आश्रमला परत आल्यानंतर शिष्यांनी गुरूना पहिल्या तीन ठिकाणांवर हसणे व चौथ्या ठिकाणावर रडण्याचे कारण विचारले; तर गुरूने उत्तर दिले. आज माळा, आसन, प्राणायाम व भगवत कथेलाच धर्म समजून जास्त लोक सोंग करत आहे. हे पाहून मला हसू आले, तसेच भगवानचे कार्य करणारा फक्त एक चिकित्सक दिसला. हे पाहून दु:ख झाले की, लोक धर्माचे वास्तविक अर्थाला कधी समजतील? खरा धर्म संसाराची सेवा करणे आणि त्याला सुधारणे आहे, जप तप करणे नव्हे. गुरूच्या बाबींमध्ये सर्व शिष्यांना आपल्या प्रश्नाच्या उत्तरासोबत धर्माचा वास्तविक अर्थ समजण्याचा ज्ञान मिळाले.

## उपदेशकथा

### देशप्रेम

स्वामी विवेकानंदांच्या मनात भारताविषयी अतोनात भक्ती होती. या देशाच्या उद्धाराचा विचार सदैव त्यांच्या अंत:करणात चालू असे. अमेरिका आणि अन्य पाश्चात्य देशांचा दौरा आटोपून स्वामीजी पुन्हा भारतात यावयास निघाले तेव्हा एका ब्रिटिश मित्राने त्यांना विचारले, आपण गेली चार वर्षे पाश्चात्य जगातली ऐश्वर्यसंपन्न, नेत्रदीपक, शक्तीमान असं आयुष्य अनुभवलं. आता आपल्याला भारतात परत जाताना कसं वाटतं? स्वामीजी म्हणाले, मी येण्यापूर्वी भारतावर माझं खूप प्रेम होतं आता तर भारतातील धुळीचाही प्रत्येक कण, तिथली हवा मला पवित्र वाटत आहे. ती भूमी आता अधिकच पवित्र वाटत आहे.' संन्याशाला असे एखाद्या विशिष्ट देशाविषयी ममत्व का वाटावे? असा प्रश्न त्यांच्या ब्रिटिश मित्राने विचारला असता स्वामीजी म्हणाले की, 'जो स्वदेशावर प्रेम करू शकत नाही, तो विश्व कसे कवेत घेणार? आधी देशप्रेम नि मगच विश्वबंधुत्व!

कथा उपदेश : जो आपल्या मायदेशावर प्रेम करतो. त्यालाच विश्वबंधुत्व साध्य होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २७:०२:४८+ |
| १३ मार्च २०२६ | योग:व्यतीपात १०:३१:०२ |
| शुक्रवार | करण:वणिज १९:२४:१९ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि (अहोरात्र) |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्– १९४७ | चन्द्र:धनु |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास– फाल्गुन | तारीख – २३ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | पारशी आबान मासारंभ |
| तिथि:दशमी (अहोरात्र) | रामानंद बिडकर महाराज |
| नक्षत्र:पूर्वाषाढा | पुण्यतिथी – पुणे |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 1 | 3 | 6 | 9 | 7 | 4 | 5 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 7 | 2 | 8 | 9 |
| 7 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 4 | 3 | 5 | 1 | 2 | 6 | 8 | 9 | 7 |
| 1 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 2 | 6 |
| 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 4 | 3 | 1 |
| 2 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 7 | 4 |
| 3 | 5 | 7 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 2 |
| 9 | 1 | 4 | 2 | 7 | 3 | 6 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०४८३ – संत फेलिक्स पोपपदी.
- १८३७ – दर चौरस मैलास साडेबारा डॉलर या भावाने रशियाने अलास्का हा प्रांत अमेरिकेस विकला.
- १९१० – स्वातंत्र्यवीर सावरकर पॅरिसहून लंडनला पोहोचताच त्यांना जॅक्सन खूनप्रकरणी अटक करण्यात आली.
- १९४० – जालियनवाला बाग हत्याकांडास जबाबदार असलेल्या जनरल ओडवायरला उधमसिंग यांनी गोळ्या घालून ठार केले.
- १९७२ – भारतीय खगोलशास्त्रज्ञांनी युरेनसचा उपग्रह शोधला.
- १९९७ – कोलकात्यातील मिशनरीज् ऑफ चॅरिटीने मदर तेरेसांची वारस म्हणून सिस्टर निर्मला यांची निवड केली.

### राष्ट्रीय

- १८५४ – ब्रिटीश रेसिडेंट मॅन्सेल यांनी नागपूर रियासत खालसा केली.

### जन्म

- १८५५ – पर्सिव्हल लॉवेल या अमेरिकन खगोल शास्त्रज्ञाचा जन्म. त्याने प्लुटो या ग्रहाच्या अस्तित्वाचे आडाखे बांधले. तसेच अरायझोनाच्या वाळवंटात फ्लॅगस्टाफ इते लॉवेल वेधशाळा बांधली.
- १८९३ – प्राच्यविद्या संशोधक डॉ. वा.वि. मिराशी यांचा जन्म.
- १९२६ – ललित लेखक रवींद्र पिंगे यांचा जन्म.

### निधन

- १८५७ – लॉर्ड विल्यम पिट् ॲमहर्स्ट यांचे निधन. त्यांनी गव्हर्नर जनरल असताना भारताची उन्हाळी राजधानी सिमला येथे नेण्याची प्रथा सुरू केली.
- १९०१ – अमेरिकेचे तेविसावे अध्यक्ष बेंजामिन हॅरिसन यांचे निधन.

## : SMS :

2 sardars were fighting after exam.
Sir: Y r u fighting?
1st Sardar: This fool left the answer sheet blank,
Sir: So what?
1st Sardar: Even i did the same thing, now teacher will think that we both copied.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.४ | २४ |
| अहमदनगर | ३३.६ | २४.३ |
| अकोला | ३७.१ | २७.६ |
| अमरावती | ३६.४ | २७.७ |
| बीड | ३८.५ | २७.५ |
| भंडारा | ३६.९ | २६ |
| बुलढाणा | ३३.४ | २१.२ |
| चंद्रपूर | ३८.१ | ३० |
| चेन्नई | ३५.३ | २७.३ |
| नवी दिल्ली | ३३.५ | २२.४ |
| धुळे | ३६.१ | २४.२ |
| गोंदिया | ३५.४ | २५.५ |
| जळगाव | ३८ | २३.३ |
| कोल्हापूर | ३३.६ | २५.६ |
| लातूर | ३३.७ | २७.३ |
| मुंबई | ३६.४ | २७.६ |
| नागपूर | ३६ | २७.३ |
| नांदेड | ३६ | २७.६ |
| नंदूरबार | ३५.१ | २४.६ |
| नाशिक | ३४.९ | २१.३ |
| पुणे | ३३.१ | २३.५ |
| पंढरपूर | ३४.८ | २६.७ |
| सातारा | ३४.२ | २१.२ |
| सांगली | ३४.३ | २६.५ |
| सोलापूर | ३४.९ | २८.२ |
| वर्धा | ३७.६ | २८.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पिवळा अनुकूल दिशा: पश्चिम कामाच्या ठिकाणी पेलवेल तेवढेच आश्वासन द्या.

**तुळ :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: दक्षिण महत्त्वाची कामे शक्यतो पुढे ढकला. वाहने सावकाश चालवा.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा : दक्षिण गोड बोलून सध्या नोकरी–व्यवसायात मर्यादित यश मिळवता येईल. आरोग्याचे प्रश्न सुटतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा: पूर्व घरातील कुरबुरी बाहेर पडू देऊ नका. स्थावराचे व्यवहार शक्यतो पुढे ढकला.

**मिथुन :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम आर्थिक अंदाज व नियोजन चांगले जमेल. भागीदारीचे प्रस्ताव फायदेशीर ठरतील.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, अनुकूल दिशा: दक्षिण पूर्वनियोजित प्रवास असेल तरच करा. अन्यथा पुढे ढकला. प्रवासात आपल्या मौल्यवान वस्तू सांभाळा.

**कर्क :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा : पूर्व जुनी दुश्मनी किंवा जुने वाद अनपेक्षित मिटतील. शत्रूपक्ष थंड राहील, वाहनांशी मस्ती परवडणार नाही.

**मकर :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा: पूर्व महिलांनी गप्पागोष्टीत वेळ वाया न घालवता स्वत:च्या करिअरकडे लक्ष दिलेले जास्त हिताचे ठरेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा: पश्चिम कोणाबद्दलचा राग, आळ किंवा गैरसमज मनात असल्यास राग दूर करून उलट मन मोठे करून सलगी साधा.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा: पश्चिम सध्या अंथरुण पाहून पाय पसरलेले बरे. तसेच पेलवेल एवढीच जबाबदारी स्वीकारलेली बरी.

**कन्या :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व भडक विचार आणि जहाल भाषा सध्या अपयशाची ठरेल.

**मीन :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा: पूर्व स्वत:च्या तब्येतीबाबत सतर्क राहणे हितकारण खाण्यापिण्यातील अतिरेक अंगाशी येणे शक्य.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८५



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन, २७. मैत्रीण
२८. पार्वती, २९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान
३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन, ६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन
८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाड्मायप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी
६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.देह ३.जो आवडतो सर्वांना १०.आजी ११.वरद १३.कजाग १४.महिषासुर १६.वाकडा १८.लागवड २१.वाद २२.क्षिती २३.नीर २६.गबाळा २८.पितर २९.बक ३०.समा ३१.गंमत ३२.इच्छा ३३.काडी ३४.सुर ३५.मित ३६.जिथे ३९.पर्वत ४०.गणेश ४२.अंगार ४४. मोलकरीण ४६.भारत ४७.तसा ४९.गवत ५०.वात ५१.ऋषी ५२.तपासणी ५३.मार ५४.मत ५५.हल्ली ५६.वर ५७.तंबोरा ५८.श्रुत ५९.चर ६०.कमी ६१.वाली ६२.नगरी ६४.गहाळ ६५.बारा ६६.शेगडी ६८.कातरवेळ ७१.करार ७२.आवर ७३.कव ७४.नट ७५.कारण ७६.सेनापती ७८.भंबेरी ७९.चार ८०.नवासी ८१.तोवर ८२.गज ८३.इकडे आड ८४.कर्ण ८५.कळस

उभे उत्तर : १.देवयानी २.हर ४.आकडा ५.वजा ६.डगला ७.सराव ८.नाम ९.विषाद १०.आरक्षित १२.दवा १५.हिवाळा १७.कर्ता १९.गट्टी २०.डगमगणे २२अ.तीर २४.रबडी २५.जमा २७.बात २८.पिच्छा ३०.सरपण ३२.इथे ३३. काडीमोड ३५.मितभाषी ३७.ज्या गावच्या बोरी ३८.सकवार ४०.गत ४१.शतपावली ४२.अंग ४३.रत ४५.रीत ४८.सासर ५१.ऋत ५३.मात ५४.मरगळ ५५.हमी ५७.तंगडी ५८.श्रुतिका ६०.कळकट ६१.वारा ६२.नगरसेवक ६३.चूर ६५.बारकावा ६६.शेव ६७.अवतीर्ण ६९.तरबेज ७०.वेळ ७२.आण ७३.कप ७४.नरडे ७५अ.रसिक ७७.नारळ ७८.भंग ७९.चाक ८०.नड

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पी.एम.पी.एम. एल.च्या भ्रष्ट कारभाराविरोधात काँग्रेस कमिटीचे तीव्र आंदोलन

पुणे (दैनिक संध्या) : आचारसहिंता भंग करून पी .एम. पी. एम. एल. या संस्थेने भ्रष्ट पध्दतीने राबविलेल्या ज्युनियर क्लार्क प्रमोशन/पद भरती, बस खरेदी व कंत्राट प्रक्रियेतील अनियमीतता, स्टोअर विभाग व साहित्य भ्रष्ट पध्दतीने खरेदी, बस स्टॉप जाहिरातीमधील भ्रष्ट कंत्राट पध्दती याच्या निषेधार्थ आज पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पी. एम. पी. एम. एल. मुख्य कार्यालय, स्वारगेट, पुणे येथे आंदोलन करण्यात आले. पी. एम. पी. एम. एल. मधील अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचारामुळे प्रमाणिक पुणेकर करदात्या नागरिकांची आर्थिक लूट होत आहे. सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी यावेळी केली. शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या समवेत माजी आमदार दिप्ती चवधरी, नगरसेवक प्रशांत जगताप, विशाल मलके, अश्विनी लांडगे, दिपाली डोख, सुनिल शिंदे, उपाध्यक्ष अजित दरेकर, प्राची दुधाणे, भरत सुराणा, नुरुद्दीन सोमजी, बाळासाहेब अमराळे, राज अंबिके, द. स. पोळेकर, संदिप मोकाटे, रवि ननावरे, कृष्णा सोनकांबळे, सुरेश चौधरी, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, अनुसया गायकवाड, सिमा सावंत, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे, सुंदर ओव्हाळ, ब्लॉक अध्यक्ष रमेश सोनकांबळे, अक्षय माने, संजय मोरे, राकेश नामेकर, रवि पाटोळे, सचिन सावंत, अनिल धिमधिमे, सागर धाडवे, फिरोज शेख आदी सहभागी होते.



### राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती व हेल्मेट वितरण

पुणे (दैनिक संध्या) : ५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा आणि जबाबदार वाहन चालकांना सुरक्षे बाबत जनजागृती करण्यासाठी तळेगाव चौक चाकण,पुणे येथे दोन दिवस मोफत हेल्मेट वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.या उपक्रमांतर्गत २०० पुरुष आणि २०० महिलांना असे एकूण ४०० हेल्मेटचे वितरण करण्यात आले हा उपक्रम अँड्रियास स्टील इंडिया आणि वाय फोर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. वाहन चालवतांना हेल्मेटसारख्या सुरक्षात्मक साधनांचा वापर करणे किती महत्त्वाचे आहे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. रस्ते अपघात कमी करण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासाची सवय नागरिकांनी अंगीकारावी असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी अँड्रियास स्टील इंडियाचे हेतल रावल-(सिनिअर मॅनेजर), संजय खैरनार –(ऑपरेशन डायरेक्टर)-दिलीप राठी(चीफ फायनान्शियल ऑफिसर),बिजेश कुमार(उपाध्यक्ष –वाय फोर फौंडेशन) लक्ष्मण झोरे,महेश चोथे(आरटीओ अधिकारी) आणि निनादसुर्वे(आयएमव्ही)उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्ता सुरक्षेबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा आणि सुरक्षिततेची संस्कृती समाजात रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला अशी माहिती बिजेशकुमार यांनी दिली. या विशेष उपक्रमासाठी सातत्याने सहकार्य आणि मार्गदर्शन करणारे अँड्रियास स्टील इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक परिंद प्रभुदेसाई यांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.




### शासनाने केलेल्या घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर दरवाढी विरोधात

पुणे (दैनिक संध्या) : शासनाने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरामध्ये अचानक फार मोठी वाढ केली तसेच गॅस सिलेंडरच्या नोंदणीचा कालावधी सुध्दा वाढविला आहे. याचा विपरीत परिणाम राज्यातील प्रत्येक कुटूंबावर होणार आहे. अच्छे दिनाचे स्वप्न दाखविणाऱ्या शासनाने मोठ्या प्रमाणात गॅस दरवाढ करून जनतेचा विश्वासघात केला आहे. या विरूध्द आज पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या विरोधात आंदोलन करण्यात आहे. यावेळी अरविंद शिंदे म्हणाले की, “महागाईने सर्वसामान्य जनतेचे जगणे आधीच कठीण झाले असताना केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने एलपीजी गॅसच्या किंमती वाढवून पठाणी लुट करत आहे. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकारने आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसच्या किंमती वाढल्या तरी त्याचा बोजा सामान्य जनतेवर पडू दिला नाही. सबसीडी देऊन जनतेला महागाईचे चटके बसू दिले नाहीत. युपीए सरकारच्या काळात घरगुती सिलेंडर ४०० रूपयांना मिळत होते, आता एका गॅस सिलेंडरसाठी ९०० रूपयांपेक्षा जास्त मोजावे लागत आहेत. सिलेंडर बुक करण्याचा कालावधीही १५ दिवसांवरून एक महिन्याचा करण्यात आला आहे. यामुळे मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किंमतीही १९०० रूपयांवर गेल्या आहेत. तसेच या सिलेंडरचे रेशनिंग करण्यात येत आहे याचा मोठा फटका विद्यार्थी, कामगार, नोकरदार, ज्यांची घरच्या जेवण्याची सोय नाही अशा लोकांना बसत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा व्यापारासाठी मोठ्या संख्येने लोकांना बाहेर जेवण करावे लागते, व्यावसायीक गॅसच्या किंमती वाढवल्याने व त्याचे रेशनिंग केल्याने या खाद्यपदार्थांचे भावही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. गॅसची टंचाई नाही असे सरकार सांगत असले तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. सर्वसामान्य जनता तसेच हॉटेल, खानावळी, खाद्यपदार्थ बनवणारे व बनवून विकणारे छोटे व्यावसायिक या सर्वांना गॅस सिलेंडर विना अडथळा सहजपणे उपलब्ध होईल याची व्यवस्था करावी. सरकारने वाढवलेल्या किंमती तात्काळ कमी करण्यात यावी.” यानंतर गॅस दरवाढ कमी करण्यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना निवेदन देण्यात आले.

# आळंदीचा समावेश ‘टेंपल टाउन डेव्हलपमेंट’ योजनेत करावा

## राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची राज्यसभेत लक्षवेधीद्वारे केंद्र सरकारकडे मागणी




पुणे (दै. संध्या) :

लाखो वारकऱ्यांचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या आळंदी शहराचा समावेश केंद्र सरकारच्या ‘टेंपल टाउन डेव्हलपमेंट’ योजनेत करावा, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी गुरुवारी राज्यसभेत केली. लक्षवेधीद्वारे ही मागणी करीत संत परंपरेचे महत्त्वपूर्ण केंद्र असलेल्या आळंदीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्राने विशेष पावले उचलावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधीचे ठिकाण म्हणून आळंदी संपूर्ण देशातील भाविकांसाठी अत्यंत पवित्र मानले जाते. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी वारीच्या काळात लाखो वारकरी आणि भाविक आळंदी येथे दाखल होत असतात. या काळात शहरातील रस्ते, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, पार्किंग आणि सार्वजनिक सुविधांवर मोठा ताण येतो. त्यामुळे नियोजनबद्ध विकासाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते, असे कुलकर्णी यांनी सभागृहात मांडले.

केंद्र सरकारने अलीकडील अर्थसंकल्पात मंदिर असलेल्या शहरांच्या आणि टियर-२ शहरांच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यावर भर दिला आहे. या धोरणाचा लाभ आळंदीला मिळाल्यास भाविकांसाठी आधुनिक सोयीसुविधा, स्वच्छता व्यवस्थापन, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन, नदीकिनारा विकास, पूरनियंत्रण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पार्किंग, रस्ते संपर्क आणि वारसा संवर्धन यांसारख्या अनेक प्रकल्पांना चालना मिळू शकते, असे आपल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे.

आळंदीची ओळख इंद्रायणी नदीशी अविभाज्यपणे जोडलेली असल्याचेही त्यांनी नमूद केले. नदीचे प्रदूषण नियंत्रण, पुनरुज्जीवन आणि नदीकाठाचा शाश्वत विकास यासाठी एकात्मिक नियोजनाची तातडीची आवश्यकता आहे. ‘टेंपल टाउन’चा दर्जा मिळाल्यास नदीसंवर्धन आणि शहर विकास यांचे एकत्रित नियोजन करणे शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आळंदीला ‘टेंपल टाउन डेव्हलपमेंट’ योजनेत समाविष्ट केल्यास शहराचा आध्यात्मिक वारसा जपत आधुनिक पायाभूत सुविधा उभारता येतील आणि देशभरातून येणाऱ्या भाविकांना अधिक सुसज्ज व सन्मानजनक अनुभव मिळेल, असे मत खासदार कुलकर्णी यांनी व्यक्त केले. तसेच स्थानिक नागरिकांच्या जीवनमानातही लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# टेंट पेगिंग मध्ये अभिषेक नवले, अर्जुन बिश्त यांची आगेकूच

*पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेला प्रारंभ ; स्टेट इक्वेस्ट्रियन असोसिएशनचा सहभाग*



पुणे (दै. संध्या) :

पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत पहिल्या दिवशी टेंट पेगिंग प्रकारात नंदुरबारच्या एम.एन.हॉर्स रायडींग अकॅडमीच्या अभिषेक नवले, नवी मुंबईच्या अश्वरूढ क्रीडा असोसिएशनच्या अर्जुन बिश्त आणि अहिल्यानगराच्या राज अश्व हॉर्स रायडींग अकॅडमीच्या विठ्ठल जिगे यांनी आगेकूच केली. स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा सुरु आहे.

स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग आहे. स्पर्धेचे उद्घाटन कर्नल (निवृत्त) सरप्रतापसिंह, राज्याचे माजी क्रीडा उपसंचालक जनक टेकाळे यांच्या उपस्थित झाले. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आयुक्त नवल किशोर राम, नगरसेवक धीरज घाटे, राघवेंद्र उर्फ बापू मानकर, स्वरदा बापट, कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित यांसह असोसिएशनचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे, सचिव नरेंद्र पाटील, खजिनदार विनायक हळबे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा स्पर्धेच्या नियोजनात सहभाग आहे.

रिंग टेंट पेगिंग या नव्या स्पर्धा प्रकारात थामेन्द्र कुमार (अश्वरूढ क्रीडा असोसिएशन) आणि अर्जुन बिश्त (अश्वरूढ क्रीडा असोसिएशन) यांना विभागून सुवर्णपदक आणि गुरुप्रीत सिंग (अश्वरूढ क्रीडा असोसिएशन) यांना रौप्य पदक मिळाले.

जिमखाना प्रकारातील बॉल अँड बकेट मध्ये चिल्ड्रेन १ (वय १२ ते १४) गटात स्वराज राजे (सुवर्ण), श्रावणी गायकवाड (रौप्य), ऋतुराज काळे (ब्राँझ) यांनी पारितोषिक मिळविले. चिल्ड्रेन २ (वय १० ते १२) गटात स्वयंम संचेती (सुवर्ण), अलंक्रीता राजपुरोहित (रौप्य) यांनी पदके मिळवली. तर, ज्युनियर (वय १४ ते १६) गटात पार्थ सोलत याने सुवर्णपदकाची कमाई केली.

ऑलिम्पिकमधील खेळाचा वेगळा प्रकार असलेल्या अश्वारोहण स्पर्धेचा हा थरार दि. १५ मार्च पर्यंत स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर दररोज सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ७ यावेळेत पुणेकरांना अनुभवता येणार आहे. स्पर्धा पाहण्यासाठी प्रवेश विनामूल्य असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अभिनेत्री अमनदीप सिद्धूसाठी तिची आईच सर्वांत ताकदवान स्त्री



पुणे (दै. संध्या) :

‘गंगा माई की बेटियाँ’मधील स्नेहाची भूमिका साकारणारी अभिनेत्री अमनदीप सिद्धू हल्लीच आपल्या आयुष्यातील सर्वांत प्रेरणादायी स्त्री, आपल्या आईबद्दल बोलली. आपल्या बालपणीच्या आठवणी सांगताना तिने व्यक्त केले की दिल्लीमध्ये तिच्या आईने एकटीने तिला आणि तिच्या दोन्ही भावंडांना मोठे केले. आणि त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक असलेला आधार आणि स्वातंत्र्य मिळावे म्हणून त्यांच्या आईने असंख्य त्याग केले. आज ती जे आहे त्यामागे तिच्या आईची ताकद, प्रोत्साहन आणि निरपेक्ष प्रेम यांचा मोठा वाटा आहे असे अमनदीप सांगते. आपल्या आईच्या अद्भुत प्रवासाबद्दल बोलताना ती म्हणाली, “माझी आई माझ्यासाठी सर्वांत ताकदवान स्त्री आहे आणि ती मला खूप प्रेरणा देते. आम्हां तिघांना (मी आणि माझी दोन भावंडे) तिने दिल्लीमध्ये एकटीने वाढवलं कारण आमच्या लहानपणी आमचे वडील बहुतेक वेळा दुबईत असायचे. दिल्लीसारख्या शहरात मुलींना वाढवण्याची जबाबदारी खूप मोठी होती, पण माझ्या आईने ती अतिशय उत्तम पद्धतीने पार पाडली आणि मी तिची सदैव ऋणी राहीन. माझ्या कुटुंबाने माझ्या स्वप्नांना आणि आकांक्षांना नेहमीच पाठिंबा दिला म्हणूनच मी आज इथे पोहोचले आहे. माझ्या आईने कधीच मला काही करण्यापासून रोखले नाही, जसे ‘गंगा माई की बेटियाँ’ मालिकेत ‘गंगा माई’ आपल्या मुलींना आयुष्यात मोठे होण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी नेहमीच साथ देते. माझी आई आणि गंगा माईने मला आयुष्यातील अनेक मौल्यवान धडे दिले आहेत आणि या अद्भुत स्त्रियांकडून मी कायमच काही ना काही शिकत राहिन अशी आशा करते.”

# छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन: स्थापना

पुणे (दै. संध्या) :

■ “पुणे जिल्हा ग्रंथालयाच्या मागणीला यश” : चंद्रशेखर कपोते



राज्य सरकारने गेली अनेक वर्षे कामकाज बंद असलेली “छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन: स्थापना केल्याबद्दल राज्य सरकारचे हार्दिक अभिनंदन. पुणे जिल्हा ग्रंथालय संघाने अनेक महिन्यांपासून केलेल्या मागणीस यश आले आहे. आज रोजी राज्य सरकारच्या विविध प्रकाशन संस्थामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर फक्त तीन पुस्तके ही संख्या तोकडी असून ती सुध्दा सध्या उपलब्ध नाहीत. राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन: स्थापना केल्यामुळे वाचकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध साहित्य उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे. तरी कृपया राज्य सरकारने सदर चरित्र साधने प्रकाशन समितीस जास्तीत जास्त निधी घ्यावा ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने प्रकाशन समिती तसेच महाराज सयाजीराव गायकवाड यांचे साहित्य नाममात्र किंमतीत उपलब्ध व्हावे. तसेच दिनदयाल उपाध्याय यांचे १९ खंड शासन मान्य ग्रंथालयास मोफत दिले त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे साहित्य शासनमान्य ग्रंथालयांना मोफत उपलब्ध व्हावे ही पुणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने नम्र विनंती. पुन्हा एकदा राज्य सरकारने गेली अनेक वर्षे कामकाज बंद असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे कामकाज सुरू केल्याबद्दल हार्दिक आभिनंदन.

# डबल डेकर फ्लायओव्हरची तपासणी सात दिवसांत

## पीएमआरडीए आयुक्तांचे आश्वासन



पुणे (दै. संध्या) :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील डबल डेकर फ्लायओव्हरच्या बाणेर रॅम्पमध्ये संभाव्य स्ट्रक्चरल त्रुटी असल्याच्या पार्श्वभूमीवर पुढील सात दिवसांत मुख्य अभियंता प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी यांनी दिले.

नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी या संदर्भात चौधरी यांची भेट घेऊन निवेदन दिले.

विद्यापीठ चौकातील पीएमआरडीएतर्फे उभारण्यात आलेल्या डबल डेकर फ्लायओव्हर प्रकल्पातील बाणेर रॅम्पचे उद्घाटन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले आहे. पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा पायाभूत प्रकल्प मानला जातो.

मात्र, रॅम्पच्या बांधकामातील एका भागाचे छायाचित्र समोर आल्यानंतर स्ट्रक्चरल जॉइंट नीट बंद न झाल्याची किंवा बांधकामाच्या गुणवत्तेत त्रुटी असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या प्रकरणाची तात्काळ तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी निम्हण यांनी केली आहे.

बाह्य स्वरूपातील दोषामुळे तात्काळ संरचनेला धोका निर्माण होईल असे नसले तरी जॉइंटमध्ये त्रुटी असल्यास दीर्घकालीन टिकाऊपणा आणि सुरक्षिततेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासंदर्भात संबंधित ठिकाणाचे स्वतंत्र स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, तसेच आवश्यक असल्यास आयआयटी, व्हीजेटीआय किंवा अन्य मान्यताप्राप्त तज्ज्ञ संस्थेकडून तृतीय पक्ष तपासणी करण्याची मागणीही निम्हण यांनी केली आहे.

दरम्यान, नुकतेच पदभार स्वीकारलेल्या पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी यांची निम्हण यांनी भेट घेत त्यांचे स्वागत केले. या वेळी चौधरी यांनी पुढील सात दिवसांत प्रत्यक्ष पाहणी करून योग्य ती कार्यवाही करतील, असे आश्वासन दिले. तसेच आवश्यकतेनुसार आपण स्वतःही स्थळभेट देऊ, असेही त्यांनी सांगितले.

# अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. बिमलेंद्र कुमार



पुणे (दै. संध्या) :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या मार्गदर्शनाखाली पद्मपाणी फाऊंडेशन आणि अभिजात भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २२ मार्च रोजी पुण्यात ‘अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन’ आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी बनारस हिंदू विद्यापीठातील (BHU) पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे माजी विभागप्रमुख आणि ज्येष्ठ विद्वान प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीची अधिकृत घोषणा संमेलनाचे मुख्य आयोजक राहुल डंबाळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे प्रमुख डॉ. महेश देवकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सिद्धार्थ धेंडे, सहस्वागताध्यक्ष डॉ. गौतम चाबुकस्वार, तसेच पद्मपाणी फाऊंडेशनच्या संचालिका सुवर्णा डंबाळे यांनी संयुक्तपणे केली.

प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार हे पाली भाषा आणि बौद्ध तत्त्वज्ञानातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत अभ्यासक मानले जातात. त्यांच्या निवडीमुळे या संमेलनाला वैचारिक आणि शैक्षणिक उंची प्राप्त होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

डॉ. कुमार यांनी पाली भाषेतील ‘अभिधम्म’ तत्त्वज्ञान, ‘धम्मसंगणी’ आणि ‘भेषज्जमंजूषा’ यांसारख्या जटिल ग्रंथांवर सखोल संशोधन केले आहे. त्यांनी आतापर्यंत १९ हून अधिक ग्रंथांचे संपादन केले असून १२५ हून अधिक संशोधन लेख विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ हून अधिक विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी संपादन केली आहे.

डॉ. कुमार यांनी बनारस हिंदू विद्यापीठात पाली विभागाचे प्रमुख म्हणून दीर्घकाळ सेवा बजावली आहे. याशिवाय दिल्ली विद्यापीठ आणि विश्वभारती विद्यापीठ (शांतीनिकेतन) येथेही त्यांनी अध्यापन केले आहे. अलीकडेच त्यांची नेपाळमधील लुम्बिनी बौद्ध विद्यापीठात ‘ICCR डॉ. बी. आर. आंबेडकर चेअर’चे पहिले प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

### पुरस्कार आणि सन्मान

पाली भाषेतील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना उत्तर प्रदेश राज्यपालांचा ‘विशेष पुरस्कार’ तसेच अखिल भारतीय विद्वत परिषदेचा ‘विद्वत भूषण’ सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

### संमेलनाचे उद्दिष्ट

हे संमेलन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या शैक्षणिक मार्गदर्शनाखाली आयोजित केले जात असून, पाली साहित्याचा प्रचार-प्रसार, संवर्धन आणि संशोधनाला चालना देणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. या संमेलनासाठी देशभरातील पाली भाषा अभ्यासक, संशोधक आणि साहित्यिक मोठ्या संख्येने पुण्यात उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## मोठी बॅटरी आणि शक्तिशाली कार्यक्षमतेसह वीवो Y51 प्रो 5G सादर

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : Vivo कंपनीने आपल्या वाय मालिकेत नवीन स्मार्टफोन Vivo Y51 Pro 5G सादर केला आहे. गतीमान कार्यक्षमता, मनोरंजनाचा उत्कृष्ट अनुभव आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी लक्षात घेऊन हा स्मार्टफोन तयार करण्यात आला असल्याची माहिती कंपनीने दिली आहे. या स्मार्टफोनमध्ये ७२०० mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून ती ४४ वॅट जलद चार्जिंगला पाठबळ देते. कंपनीच्या माहितीनुसार या बॅटरीमुळे दीर्घकाळ व्हिडिओ पाहणे, खेळ खेळणे आणि सामाजिक माध्यमांचा वापर करणे शक्य होते. तसेच बायपास चार्जिंग आणि बॅटरीचे आरोग्य टिकवून ठेवणारी विशेष प्रणालीही देण्यात आली आहे. फोनमध्ये MediaTek Dimensity 7360 Turbo हा शक्तिशाली संच देण्यात आला आहे. हा संच उच्च कार्यक्षमता आणि ऊर्जा बचतीसाठी ओळखला जातो. या संचाला चाचण्यांमध्ये सुमारे ९.२ लाख गुण मिळाले असून त्यामुळे खेळ खेळताना आणि एकाच वेळी अनेक कामे करताना गतीमान अनुभव मिळतो. या फोनमध्ये ८ जीबी स्मरणशक्ती असून ती अतिरिक्त ८ जीबीपर्यंत वाढवता येते. साठवणुकीसाठी १२८ जीबी आणि २५६ जीबी असे पर्याय उपलब्ध आहेत. छायाचित्रणासाठी या स्मार्टफोनमध्ये ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे. या कॅमेऱ्याच्या मदतीने विविध प्रकाश परिस्थितीत स्पष्ट आणि तपशीलवार छायाचित्रे घेता येतात. यामध्ये ४ के दर्जाचे चित्रफित चित्रीकरण आणि चित्रफित अधिक स्थिर ठेवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक स्थिरीकरण तंत्रज्ञान देण्यात आले आहे.

## व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी घोष यांची नियुक्ती



नवी दिल्ली (दैनिक संध्या) : एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीच्या संचालक मंडळाने आज पार्थनिल घोष यांना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बढती दिल्याची मंजुरी दिली. ही नियुक्ती 16 एप्रिल 2026 पासून लागू होईल आणि ती आयआरडीएआय तसेच इतर आवश्यक मंजुरींवर अवलंबून असेल. या नव्या भूमिकेत ते अनुज त्यागी यांचे उत्तराधिकारी ठरतील. वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रातील तीन दशकांहून अधिक व्यावसायिक अनुभवामुळे घोष यांना स्थानिक बाजाराचे सखोल ज्ञान आहे. जनरल इन्शुरन्स उद्योगातील संपूर्ण मूल्यसाखळीमध्ये त्यांना 16 वर्षांहून अधिक व्यापक आणि विविध अनुभव आहे. 2016 मध्ये एल अँड टी जनरल इन्शुरन्सच्या विलीनीकरणानंतर ते कंपनीत सामील झाले आणि 1 मे 2025 पासून कार्यकारी संचालक म्हणून काम पाहत आहेत. कंपनीच्या वाढीच्या दिशेला आकार देण्यात घोष यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने रिटेल फ्रँचायझी मजबूत केली तसेच कमर्शियल लाईन्स, पीक विमा, अंडररायटिंग, रीइन्शुरन्स धोरण, क्लेम व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान व डिजिटल क्षेत्रात मजबूत क्षमता निर्माण केल्या. घोष यांनी मोठ्या धोरणात्मक एकत्रीकरण आणि एकसंधीकरण उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यात एल अँड टी जनरल इन्शुरन्स आणि अपोलो म्युनिक हेल्थ इन्शुरन्सच्या यशस्वी विलीनीकरणाचा समावेश आहे.

# अॅमेझॉन एमएक्स प्लेयरकडून १५०+ कार्यक्रमांसह कलाकृतींचे अनावरण




मुंबई (दै. संध्या) : भारतातील आघाडीची मोफत स्ट्रिमिंग सेवा असलेल्या अॅमेझॉन एमएक्स प्लेयरने आज 2026 साठी 150 हून अधिक नवीन आणि परतून येणाऱ्या कार्यक्रम (रिटर्निंग शो)चे अनावरण करत, आतापर्यंतच्या सर्वात विस्तृत कलाकृतींची घोषणा केली. शैली, स्वरूप आणि कथाकथन प्रकारांमध्ये विस्तारलेल्या कलाकृती देशभरातील प्रेक्षकांना या वैविध्यपूर्ण कथा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून उच्च दर्जाची करमणूक देणाऱ्या मंचाच्या ध्येयाला बळकटी देते. कलाकृतींच्या गुलदस्त्यात अग्रस्थानी असलेल्या प्रमुख शीर्षकांपैकी नसिरुद्दीन शाह आणि जिम सर्भ अभिनीत 'मेड इन इंडिया: द टायटन स्टोरी' हे महत्त्वाकांक्षा आणि वारसा निर्माण करण्यावर केंद्रित प्रेरणादायी नाट्य आहे. नाना पाटेकर, संजय कपूर, नीरज काबी आणि मोहम्मद झीशान अयूब यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'संकल्प' हा सत्ता तसेच नेतृत्व पैलूंचा शोध घेणारा एक मनोरंजक सामाजिक-राजकीय थ्रीलर आहे. न्याय, सूडबुद्धी आणि थरार या संकल्पनांवरील 'अब होगा हिसाब', ज्यात शाहीर शेख, मौनी रॉय आणि संजय कपूर झळकणार आहेत. तसेच अमोल पराशर अभिनीत 'द ब्युरोक्रॅट'सारख्या प्रशासकीय नाट्य पाहता येईल. साकिब सलीम अभिनीत 'कप्तान', सनी हिंधुजा अभिनीत 'विमल खन्ना', दिव्येंदु शर्मा आणि भुवन अरोरा अभिनीत कॉप ड्रामा 'वेटिंग है' सोबतच रवी किशन, अमेय वाघ आणि विशाल जेठवा अभिनीत 'क्लीन अप क्रू' हा क्राइम ड्रामा झळकणार आहे. एकत्रितपणे, या कलाकृती अॅमेझॉन एमएक्स प्लेअरची व्याप्ती आणि विकसित होणारी सर्जनशील दृष्टी प्रतिबिंबित करतात. कारण त्या प्रेक्षकांसाठी उत्कृष्ट कथानके घेऊन येणार आहेत. राजीव खंडेलवाल, आमिर अली, रवी बहल आणि बरखा बिष्ट यांच्या भूमिका असलेला 'अमर विश्वास' हा कायद्यावरील कोर्टरूम ड्रामा अलीकडच्या कलाकृतींनी निर्माण केलेल्या जोरदार वातावरणात आगामी पर्याय तयार करतो आहे. अशाप्रकारची विविधांगी पैलू असलेली कथानकं प्रेक्षकांना अधिक भावतात. तेजस्वी प्रकाश आणि रवी किशन अभिनीत 'सायको सैयां' या रोमँटिक थ्रीलरने प्रखर कथानकांसह प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारी कलाकृती बनवली आहे. अॅमेझॉन एमएक्स प्लेयर अनेक यशस्वी फ्रँचायझींचा विस्तार प्रेक्षकांना आवडणाऱ्या नवीन सीझनसह करेल. ज्यात रक्तांचल सीझन 3, सोबतच तरुणाईच्या पसंतीच्या कॅम्पस बीट्स सीझन 6, कॅम्पस डायरीज सीझन 2, हार्टबीट्स सीझन 2 आणि हू इज योर गायनॅक सीझन 2 चा समावेश आहे. या कलाकृतींच्या परतून येणाऱ्या आवृत्त्या नाट्य, युवा संस्कृती आणि नातेसंबंध-आधारित कथाकथनातील प्रेक्षकांशी 'सर्व्हिस-कनेक्शन' मजबूत करत राहतात. अनस्क्रिप्टेड प्रकारात, अॅमेझॉन एमएक्स प्लेयर आपला फ्लॅगशिप रिॲलिटी शो राईज अँड फॉल सीझन 2 पुन्हा घेऊन येतो आहे. (ऑल3मीडिया इंटरनॅशनलद्वारे परवानाधारक आणि मूळतः यूकेमधील स्टुडिओ लॅम्बर्ट निर्मित) जो त्याच्या पदार्पणाच्या हंगामात सर्व्हिसवरील सर्वाधिक चर्चेत असलेल्या कार्यक्रमांपैकी एक म्हणून उदयास आला. बॅटलग्राऊंड सीझन 2 ही भारताची पहिली आणि एकमेव फिटनेस रिॲलिटी मालिका आहे. ज्यात शिखर धवन मुख्य मार्गदर्शकाच्या वेशात दिसेल. या सर्व्हिसने अलीकडेच सुनील शेट्टीच्या 'भारत के सुपर फाउंडर्स' चा देखील समारोप केला. ज्यात पात्र स्टार्टअप्सना ₹100 कोटी रुपयांचा निधी मिळाला. ज्यामुळे प्रभावी, मोठ्या प्रमाणात अनस्क्रिप्टेड प्रोग्रामिंगमध्ये अॅमेझॉन एमएक्स प्लेयरची वाढती उपस्थिती बळकट झाली.

अॅमेझॉन एमएक्स प्लेअरच्या उत्पादन, तंत्रज्ञान आणि मार्केटिंग प्रमुख अरुणा दर्यानानी म्हणाल्या, "अॅमेझॉन एमएक्स प्लेअरच्या प्रेक्षकांची वेगवान वाढ जाहिरातदारांच्या स्वीकाराला चालना देत आहे. ज्यामुळे आकर्षक कंटेंट, दर्शकांची व्यस्तता आणि ब्रँड भागीदारी यांच्यात एक शक्तिशाली उड्डाणपूल तयार होत आहे." 2026 च्या कलाकृती दाखल होत असताना, भारतभरातील प्रेक्षक अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर सर्व कार्यक्रम विनामूल्य स्ट्रिमिंग करू शकतात. जे मोबाईल, कनेक्टेड टीव्ही, अॅमेझॉन शॉपिंग अॅप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही, जिओ टीव्ही आणि एअरटेल एक्सट्रीमवर उपलब्ध आहेत.

## जेमी नाईट यांचे पोदार इंटरनॅशनल स्कूल, बल्लारपूर येथे प्रेरणादायी पुनरागमन

बल्लारपूर (दै. संध्या) : जगप्रसिद्ध फ्रीस्टाईल फुटबॉलपटू Jamie Knight यांच्या उपस्थितीमुळे Podar International School, बल्लारपूर येथे उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या कडून थेट प्रेरणा घेण्याची संधी मिळाली. जगातील अव्वल दहा फ्रीस्टाईल फुटबॉलपटूंमध्ये गणना होणारे तसेच अनेक Guinness World Recordsचे मानकरी असलेले जेमी नाईट सध्या भारताच्या सातव्या दौऱ्यावर आहेत. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उत्कृष्टता उपक्रमाअंतर्गत त्यांनी शाळेत विशेष कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, एकाग्रता, शिस्त आणि जिद्द यांचे महत्त्व रुजवणे हा होता. जेमी नाईट यांनी फुटबॉलवरील आपल्या अद्वितीय नियंत्रण कौशल्याचे थक्क करणारे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांच्या कसरती आणि अचूक नियंत्रणामुळे उपस्थित विद्यार्थी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. जेमी नाईट हे जागतिक स्तरावर फुटबॉलवरील असामान्य कौशल्यासाठी ओळखले जातात. त्यांनी UEFA Euro 2020 स्पर्धेत अधिकृत जागतिक मॅस्कॉट म्हणून तसेच UEFA Champions League Final (२०१७ आणि २०१८) मध्ये विशेष सादरीकरण केले आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जेमी नाईट म्हणाले, "भारतामध्ये पुन्हा येणे आणि विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, कौशल्य आणि सर्जनशीलतेत झालेली वाढ पाहणे नेहमीच आनंददायी असते. पोदार इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांचा उत्साह आणि ऊर्जा मला नेहमीच प्रेरणा देते." यावेळी पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक हर्ष पोदार म्हणाले की, "जेमी नाईट यांच्या प्रत्येक भेटीचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव पडतो. त्यांच्या कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांना केवळ फुटबॉलचे तांत्रिक ज्ञानच नाही तर शिस्त, एकाग्रता आणि चिकाटी यांसारखी जीवनमूल्येही शिकायला मिळतात."

## एअरटेल आपली ग्राहकहिताच्या ध्यासाची संस्कृती करत आहे बळकट

पुणे (दै. संध्या) :

■ आपल्या ग्राहकांना मिळणाऱ्या अनुभवाची गुणवत्ता उंचावणे आणि मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या समस्या सोडवणे यावर नवीन पद्धतीने केंद्रित केलेले लक्ष



एअरटेल यांनी आज आपली ग्राहक दिन 2026, ही संस्थेमधील एक व्यापक मोहीम चिन्हित केली जी ग्राहकांच्या समस्या समजून घेणे आणि सातत्याने आपल्या वितरण अनुभवात सुधारणा करण्यावर केंद्रित आहे. नेतृत्व टीमपासून ते कार्यविषयक तज्ज्ञांपर्यंत जवळपास सुमारे वीस हजार एअरटेल कर्मचारी त्यांच्या कार्यालयांमधून बाहेर आले आणि क्षेत्रामध्ये आघाडीच्या टीमसह काम करून ग्राहकांसह थेट संपर्क साधण्यासाठी, क्षेत्र अभियंत्यांसोबत घरे आणि दुकानांना भेटी देऊन, आणि रिटेल तसेच सेवा केंद्रांसह परस्पर संवाद साधून सर्वात महत्वाच्या समस्यांविषयी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी कार्यरत झाले. एअरटेल मधील ग्राहक दिन म्हणजे संस्थेसाठी आत्मपरीक्षण करण्यासाठी आणि स्वतःला एक साधा परंतु अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारण्यासाठी एक हेतुपुरस्सर घेतलेला विराम ठरतो: आपण आपल्या ग्राहकांसाठी अधिक काय करू शकतो? उपक्रमावर टिप्पणी करताना, शाश्वत शर्मा, व्यवस्थापकीय संचालक आणि CEO, एअरटेल इंडिया, म्हणाले: "ग्राहक दिन हा आम्हाला ग्राहकांचे म्हणणे सखोलतेने ऐकून घेण्याच्या, स्वतःला आव्हान देण्याच्या आणि तत्परतेने कृती करण्याच्या आमच्या जबाबदारीची महत्वाची आठवण करून देतो. हा दिन ग्राहकांच्या समस्या सोडविणे, ग्राहक अनुभव सुलभ बनवणे आणि आमच्या लाखो ग्राहकांना दररोज वितरित केल्या जाणाऱ्या सेवेचा दर्जा सातत्याने उंचावण्यासाठी आमची वचनबद्धता अधिक बळकट करतो."

ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी असलेली ही पद्धत आणि संस्कृती एअरटेलच्या अनेक ग्राहक-केंद्रित नवोपक्रमांमध्ये केंद्रस्थानी राहिली आहे. अधिक मजबूत केलेल्या स्पाम आणि फ्रॉड संरक्षणापासून ते एअरटेल ॲप आणि नवीन-युगाच्या AI-सक्षम साधनांमध्ये अधिक विस्तृत प्रवेशासह अधिक सोप्या, अधिक उत्स्फुर्त डिजिटल प्रवासांद्वारे एअरटेलच्या उपायांना श्रवणाद्वारे आकार मिळाला आहे. ग्राहक दिन एअरटेलचा हा विश्वास देखील मजबूत करतो की अनुभवात सुधारणा ही नैमित्तिक नाही तर निरंतर असते. ग्राहकांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेऊन आणि त्यांच्या प्रतिक्रियांवर निर्णायकपणे कृती करून, कंपनी प्रक्रिया सुलभ करणे, अडथळे दूर करणे आणि विश्वासार्ह, उत्स्फुर्त आणि प्रतिसादक्षम सेवांची रचना करण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवत आहे. हा दिन एअरटेलला एकाच, चिरस्थायी उद्देशामागे एकजूट करतो: अशी कंपनी बनणे जेथे ग्राहकहिताचा ध्यास हे केवळ घोषवाक्य नाही, तर संस्कृती आहे -- अशी संस्कृती जी निरंतर सुधारणेला चालना देते आणि प्रत्येक निर्णयाची सुरवात आणि शेवट ग्राहकापासूनच होईल याची खात्री करते.

## कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत कामगार सुरक्षिततेसाठी जनजागृती कार्यक्रम



कुरकुंभ (दै. संध्या) : राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने हेन्केल इंडिया या उद्योगसमूहाने कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि कामगार संहितेबाबत जनजागृती करण्यासाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (डीआयएसएच) यांच्यासोबत संयुक्त उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमास संचालनालयाचे सहसंचालक सुधीर शिंदे, उपसंचालक प्रविण पाटील तसेच कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यंदाच्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची संकल्पना 'सहभाग, शिक्षण आणि सक्षमीकरण' अशी असून कामाच्या ठिकाणी जागरूकता, प्रशिक्षण आणि सामूहिक जबाबदारीच्या माध्यमातून सुरक्षिततेची संस्कृती अधिक मजबूत करण्यावर या कार्यक्रमात भर देण्यात आला.

या चर्चासत्रादरम्यान कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील उद्योगांनी परस्पर सहकार्य वाढवणे, चांगल्या कामकाज पद्धतींची देवाणघेवाण करणे तसेच व्यावसायिक आरोग्य, कामगार सुरक्षा आणि प्रक्रिया सुरक्षितता यांसारख्या क्षेत्रांमध्ये एकमेकांकडून शिकण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

यावेळी बोलताना सहसंचालक सुधीर शिंदे म्हणाले, "अशा प्रकारच्या संयुक्त उपक्रमांमुळे जागरूकता वाढते, नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे होते आणि संपूर्ण औद्योगिक क्षेत्रात सुरक्षित कामाचे वातावरण निर्माण करण्याची बांधिलकी अधिक बळकट होते."

हेन्केल कुरकुंभचे प्रकल्प संचालक बालाजी गोपालस्वामी म्हणाले, "सहभाग, शिक्षण आणि सक्षमीकरण ही संकल्पना आमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. सातत्यपूर्ण संवाद आणि अनुभवांची देवाणघेवाण यामुळे उद्योगांमध्ये सुरक्षिततेची संस्कृती अधिक मजबूत होते. अशा व्यासपीठामुळे कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांना व्यावसायिक आरोग्य व सुरक्षिततेबाबतचे अनुभव एकमेकांसोबत शेअर करण्याची संधी मिळते."

या उपक्रमात केंद्र शासनाने लागू केलेल्या नवीन कामगार संहितेबाबत, विशेषतः व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी संहिता याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. कामगार सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार भारतात ५० कोटींहून अधिक कामगार कार्यरत आहेत. त्यामुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि नियमांचे पालन हे उद्योग आणि प्रशासन या दोघांसाठीही अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

## 7200mAh बॅटरी आणि दमदार परफॉर्मन्ससह iQOO Z11x भारतात लॉन्च

नवी दिल्ली (दै. संध्या) : iQOO ने भारतीय बाजारात नवीन स्मार्टफोन iQOO Z11x लॉन्च केला आहे. विशेषतः कॉलेज विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला हा स्मार्टफोन दमदार परफॉर्मन्स, मोठी बॅटरी आणि प्रगत एआय फीचर्ससह सादर करण्यात आला आहे. कंपनीच्या मते, हा आपल्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोनपैकी एक असून तो MediaTek Dimensity 7400 Turbo प्रोसेसरवर चालतो. या प्रोसेसरला 1 मिलियनपेक्षा जास्त AnTuTu बेंचमार्क स्कोअर मिळतो, ज्यामुळे स्मूथ मल्टीटास्किंग आणि गेमिंगचा उत्तम अनुभव मिळतो. iQOO Z11x मध्ये सेगमेंटमधील सर्वात मोठी 7200mAh बॅटरी



देण्यात आली आहे. ही बॅटरी 44W फ्लॅशचार्ज सपोर्टसह येते आणि दीर्घकाळ टिकणारी कार्यक्षमता देते. कंपनीच्या दाव्यानुसार, एका चार्जमध्ये हा फोन सुमारे 40 तास व्हिडिओ प्लेबॅक, 93 तास म्युझिक प्लेबॅक, 15 तासांपेक्षा जास्त गेमिंग आणि 18 तास सोशल मीडिया वापर देऊ शकतो. फक्त 10 मिनिटांच्या चार्जिंगमध्ये सुमारे 6 तासांचा टॉक टाइम मिळतो. याशिवाय बायपास चार्जिंग आणि ओव्हरनाईट चार्जिंग प्रोटेक्शनसारखी फीचर्सही देण्यात आली आहेत.


## ग्रामपंचायत मालेगाव खु., ता. बारामती, जि. पुणे

**B1 नोटीस क्रमांक -१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत मालेगाव खु., ता. बारामती, जि. पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत मालेगाव खु. ता. बारामती जि.पुणे यांच्याकडुन दिनांक १३/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक १३/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा ग्रामपंचायत सोई नुसार/मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा प्रसिद्ध करण्याचा दिनांक | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालेगाव खु. येथे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प करणे. | ७८८०३६/- | दि १३/०३/२०२६ ते दि २०/०३/२०२६ | ५९०/- | ७८८०/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत मालेगाव खु. PDCC बँक शाखा क्र. खाते वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. सोबत निविदेच्या अटी व शर्ती देण्यात येतील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाची दाखले असल्यास जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत मालेगाव खु. PDCC बँक शाखा खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्रझाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत मालेगाव खु. यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत मालेगाव खु., ता. बारामती, जि. पुणे


# डुकाटी इंडियाने तरुणांना दिला रस्ता सुरक्षेचा संदेश




वडगाव शेरी (दै. संध्या) : डुकाटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रतिनिधींनी वडगाव शेरी येथील लाईटहाऊस मधील तरुणांशी संवाद साधण्यासाठी लाईटहाऊस सेंटरला भेट दिली. डुकाटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रतिनिधींनी वडगावशेरी येथील लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन सेंटरला भेट दिली आणि इटालियन सुपरबाईक्सच्या जगाच्या पलीकडे महत्त्वाकांक्षा, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन यावर संदेश दिला.

डुकती इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी श्री विशाल गोयल भेटीदरम्यान उपस्थित होते आणि त्यांनी लाईटहाऊस तरुणांशी संवाद साधला, श्री. गोयल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना त्यांच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित केले. "शिस्त म्हणजे फक्त वेगाने मोटारसायकल चालवणे नाही. जीवनातील प्रत्येक आव्हानाला तुम्ही कसे सामोरे जाता याबद्दल आहे," असे त्यांनी उपस्थितांना सांगितले."

डुकाटी इंडियाच्या सीएसआर उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ पुणे रिव्हरसाइड द्वारे पाठिंबा देण्यात आला आहे, ज्याने लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनशी सहकार्य केले आहे.लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन, जे पुण्यातील तरुणांसाठी करिअर मार्गदर्शन, जीवन कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगार समर्थन कार्यक्रम चालवते.

लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनचे सह-संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन म्हणाले "वंचित पार्श्वभूमीतील तरुणांमध्ये प्रतिभा किंवा दृढनिश्चयाची कमतरता नसते. त्यांच्याकडे बहुतेकदा प्रवेशाची कमतरता असते. जेव्हा डुकाटीसारख्या संस्था अशा केंद्रात येण्याचा निर्णय घेतात, तेव्हा ते एक शक्तिशाली संदेश देते की या भिंतींच्या पलीकडे असलेले जग त्यांचेच आहे."

डुकाटी टीमच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांशी रस्ते सुरक्षा आणि जबाबदार सायकलिंगबद्दल देखील बोलले, जे पुणे शहरासाठी वाहतूक सुरक्षेच्या चिंतांकडे लक्ष देत असल्याने एक महत्त्वाचा संदेश आहे.

लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन भारतातील लाखो वंचित तरुणांसाठी जीवन कौशल्ये, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधींद्वारे सशक्त समुदाय निर्माण करण्याच्या मोहिमेवर आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारी - त्याच्या अद्वितीय पीपीपी मॉडेलद्वारे, लाइटहाऊस २०१५ पासून मोठ्या प्रमाणात शहर-व्यापी परिवर्तनासाठी काम करत आहे, जिथे सरकार पायाभूत सुविधा म्हणजेच भांडवली खर्च प्रदान करते आणि खाजगी क्षेत्र ऑपरेटिंग खर्च तसेच कार्यक्रमाची अंमलबजावणी करते. आजपर्यंत २.५ लाख नागरिक प्रभावित झाले आहेत.


## ग्रामपंचायत बऱ्हाणपूर, ता. बारामती, जि. पुणे

**B1 नोटीस क्रमांक -१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत बहऱ्हाणपूर, ता. बारामती, जि.पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत बऱ्हाणपूर ता. बारामती जि.पुणे यांच्याकडुन दिनांक १३/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक १३/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा ग्रामपंचायत सोई नुसार/मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा प्रसिद्ध करण्याचा दिनांक | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | बऱ्हाणपूर येथे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प करणे. | ५५२८५२/- | दि १३/०३/२०२६ ते दि २०/०३/२०२६ | ५९०/- | ५५२९/- |
| २ | नेपतवळण येथे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प करणे. | ९८६५९/- | | २३६/- | ९८७/- |
| ३ | ग्रामपंचायत कार्यालय सुधारणा करणे. | ९६९४५/- | | २३६/- | ९६९/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत बऱ्हाणपूर PDCC बँक शाखा बारामती खाते क्र. ००९००२६००००००२६ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. सोबत निविदेच्या अटी व शर्ती देण्यात येतील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाची दाखले असल्यास जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत बऱ्हाणपूर PDCC बँक शाखा बारामती खाते क्र. ००९००२६००००००२६ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्रझाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत बऱ्हाणपूर यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत बऱ्हाणपूर, ता. बारामती, जि. पुणे



# सायकलवरून घरी जाणाऱ्या १४ वर्षीय विद्यार्थ्याला डंपरने चिरडले

**पिंपरी (दै. संध्या) :**

चिंचवड येथील प्रेमलोक पार्क परिसरात भरधाव डंपर (आरएमसी ट्रक)च्या धडकेत सायकलवरून घरी जाणाऱ्या १४ वर्षीय शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आकुर्डीहून चिंचवड गावकडे जाणाऱ्या रस्त्यावर आज (दि.१२) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. फारुक शकील तांबोळी (वय १४) हा नववीत शिकणारा विद्यार्थी सायकलवरून शाळेतून घरी जात असताना भरधाव आरएमसी ट्रकने त्याला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, या अपघाताचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून त्यामध्ये ट्रकची धडक स्पष्टपणे दिसत आहे. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी ट्रक चालकासह ट्रक ताब्यात घेतला असून पुढील कारवाई सुरू केली आहे. या संदर्भात पोलिस निरीक्षक दत्ता चासकर यांनी सांगितले की, या प्रकरणी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून अपघाताबाबत अधिक तपास केला जात आहे.

## तरुणाला बेदम मारहाण करत खुनाचा प्रयत्न

पिंपरी (दै. संध्या) : रहाटणी येथील बीआरटी रोडवर दुचाकीचा अपघात झाल्यानंतर झालेल्या वादातून एका तरुणाचा गळा दाबून आणि बेल्टने मारहाण करून खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना सोमवारी (९ मार्च) रात्री ९ वाजेच्या सुमारास स्पॉट १८ मॉलसमोर घडली. याप्रकरणी कुणाल विलास पालवे (२७, क्षितीज कॉलनी, जगताप डेअरी, रहाटणी, पुणे) यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी बाबू पाटील (३०, काळेवाडी, पुणे), अभिषेक माडगुळे (२२, काळेवाडी, पुणे), विकी सुतार (३०, काळेवाडी, पुणे) आणि त्यांच्या एका साथीदारावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आपल्या दुचाकीवरून जात असताना समोरून आलेल्या दुसऱ्या दुचाकीशी त्यांचा अपघात झाला. यावेळी तिथे कारमधून आलेल्या आरोपींनी "तुझीच चूक आहे" असे म्हणत वाद घातला. बाबू पाटील याने फिर्यादीचा गळा दाबला, तर त्याच्या साथीदाराने कमरेच्या बेल्टने फिर्यादीच्या डोक्यावर आणि तोंडावर गंभीर प्रहार केले. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

# 'रणभूमी २०२६' भव्य आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा उत्साहात प्रारंभ

**पिंपरी (दै. संध्या) :**

पुण्यातील Indus Business School (IIEBM) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'रणभूमी २०२६' या भव्य आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा उत्साहात प्रारंभ झाला. ३५ पेक्षा अधिक महाविद्यालयांमधील शेकडो विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले असून कॅम्पसवर उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे.

१० मार्च रोजी IIEBM कॅम्पसमध्ये पारंपरिक नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर विविध महाविद्यालयांच्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. प्रत्येक महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रंगीबेरंगी जर्सी आणि पोस्टरमुळे वातावरणात ऊर्जा संचारली.



११ मार्च रोजी चांदखेड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट क्लब येथे मुख्य उद्घाटन सोहळा पार पडला. नारळ फोडून स्पर्धेची पारंपरिक पद्धतीने सुरुवात करण्यात आली. यावेळी 'रणभूमी' ध्वजाचे अनावरण, चॅम्पियनशिप ट्रॉफीचे अनावरण तसेच आकाशात फुगे सोडून स्पर्धेची अधिकृत घोषणा करण्यात आली. या प्रसंगी IIEBMचे व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर जयसिंग मारवाह यांनी सर्व खेळाडूंना प्रामाणिकपणा, धैर्य आणि क्रीडाभावनेने स्पर्धा करण्याची शपथ दिली. "रणभूमी ही केवळ क्रीडा स्पर्धा नसून भविष्यातील नेतृत्व घडवणारे व्यासपीठ आहे. येथे धाडस, स्पर्धात्मकता आणि आत्मविश्वास यांची खरी परीक्षा होते," असे ते म्हणाले. कार्यक्रमाला चांदखेडच्या सरपंच मीना माळी, माजी पोलीस पाटील दत्तात्रय माळी, राष्ट्रवादी काँग्रेस पुणे जिल्ह्याचे उपाध्यक्ष योगेश शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच प्रायोजक संस्थांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

स्पर्धेत क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ तसेच ४×१०० मीटर रिलेसारख्या आकर्षक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेसाठी एकूण दीड लाख रुपयांहून अधिक बक्षीस रक्कम ठेवण्यात आली आहे.

विशेष म्हणजे प्रत्येक संघाला छत्रपती शिवाजी महाराज यांनी जिंकलेल्या किल्ल्यांची नावे देण्यात आली आहेत. क्रीडा स्पर्धांसोबतच IIEBM कॅम्पसमध्ये डीजे शो आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांसाठी हा क्रीडा महोत्सव उत्साहाचा पर्व ठरत आहे. 'रणभूमी २०२६' मुळे पुण्यातील महाविद्यालयीन क्रीडा क्षेत्रात नवा जोश निर्माण झाला आहे.

# आठ प्रभागांसाठी आठ स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती

*पशुवैद्यकीय तक्रारींच्या निवारणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा मोठा निर्णय*

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या पशुवैद्यकीय विभागाशी संबंधित तक्रारींचे अधिक वेगाने आणि प्रभावीपणे निवारण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील श्वानांच्या उपद्रवाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच महापौर रवि लांडगे यांनी दिलेल्या निर्देशानुसार नागरिक आणि नगरसेवकांना त्यांच्या समस्या थेट मांडता याव्यात व त्यांचे तातडीने निराकरण व्हावे यासाठी क्षेत्रीय स्तरावर नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे यापूर्वी तक्रारींचे निवारण प्रामुख्याने केंद्र स्तरावरून होत असल्याने कार्यवाहीस वेळ लागत होता. मात्र आता प्रत्येक प्रभाग स्तरावर तात्काळ कार्यवाही व्हावी यासाठी आठही प्रभागांसाठी स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे तक्रारींचे वेळेत निरसन होण्यास मोठी मदत होणार आहे. महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. या यंत्रणेद्वारे श्वानांवर उपचार तसेच नसबंदी करणे, आक्रमक श्वानांना तात्पुरते निरीक्षणाखाली ठेवणे आदी सुविधा पुरविण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. महानगरपालिकेमार्फत ही सर्व कामे भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येणार आहेत.

**■ नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ होणार कार्यवाही**

समन्वय अधिकारी व संपर्क क्रमांक :-

मदनुरकर इरण्णा – अ प्रभाग – ९१३०५८०७५१

शरद राठोड – ब प्रभाग – ७७७६८१२०९०

राहुल गुलाले – क प्रभाग – ७९७२६०९२७८

निरज हटवार – ड प्रभाग – ७०२०३१४९४३

समीक्षा कुंभार – इ प्रभाग – ९४२१६३२५३८

सुरज शिंदे – फ प्रभाग – ९३७०४४३८१५

निशिगंधा कचवे – ग प्रभाग – ९२८४८०११७७

सुनील कांबळे – ह प्रभाग – ८८८८४४२०४६

महानगरपालिकेमार्फत हे संपूर्ण कामकाज भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पार पाडले जात असलेने श्वानांचे स्थलांतरण (Relocation) केले जात नाही, हे पशुवैद्यकीय विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालये यांच्या आस्थापनांना संरक्षक कुंपण करावे, त्यांच्या स्तरावर नोडल अधिकारी नेमणूक करावी आणि परिसरातील श्वानांची संख्या प्रशासनास कळवावी, असे मेलद्वारे कळविण्यात आले आहे. संबंधित संस्थांकडून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही केली जाईल.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी (दै. संध्या) :**



> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस अनुदान देण्याच्या उपसूचनेस बैठकीत मान्यता देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीत पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाईपलाईन दुरुस्ती, शहरातील दिव्यांची दुरुस्ती व देखभाल, दफनभूमी सुरक्षा नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणाऱ्या प्रकल्पांसाठी टाकणे, तसेच महापालिकेच्या नगररचना विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची रजा मंजुरी खर्च यासह मनपा हद्दितील मालमत्ता कराची बिले वाटणाऱ्या महिलांनी नवीन मालमत्ता शोधल्यास त्यांना मनपाच्या कर संकलन विभागाच्या मंजूर दराने मानधन देण्याबाबतच्या उपसूचनेला मंजुरी देण्यात आली. या सोबतच "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेचे अर्ज बचत गटांतील माहिलामार्फत भरून घेतलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे महिला आर्थिक विकास महामंडळ या संस्थेस माहे जूलै २०२४ ते सप्टेंबर -२०२४ या कालावधीतील प्रोत्साहन भत्ता अदायगी करणे बाबतच्या उपसुचनेस आज महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह स्थायी समिती सदस्य व महापालिका संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आजच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये, पाणी पुरवठा विभागाकडील शहरातील पाण्याची तसेच नद्यांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करणे, घरकुल पासून जाधववाडी पंप हाऊस पर्यंत आवश्यकतेनुसार पाईप लाईन टाकणे, कुदळवाडी एसटीपी ते लक्ष्मी चौक देहू आळंदी रोड पर्यंत आवश्यकतेनुसार पाईप लाईन टाकणे, काळेवाडी परिसरातील दिव्यांच्या देखभाल व दुरुस्ती च्या कामांना मंजुरी, प्रभाग क्र. १७ मध्ये दिव्यांच्या देखभाल व दुरुस्ती करणे, प्रभाग क्र. १६ मध्ये दिव्यांच्या देखभाल व दुरस्ती करणे, ब क्षेत्रीय कार्यालयाच्या नवीन इमारतीचे विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती व अनुषांघिक कामे करणे, मोशी येथे दफन भूमी विकसित करून अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे, यमुनानगर रुग्णालयात जनित्र संच बसविणे, निगडी अमरधाम स्मशानभूमी येथे जनित्र संच उभारणे, प्रभाग क्र. १ व १२ मधील विविध चौक व कमानीचे सुशोभीकरण व अनुषांघिक कामे करणे, भक्ती शक्ती चौकातील अण्णाभाऊ साठे बस टर्मिनल येथे इव्ही चार्जिंग स्टेशन उभारणे, मनपा शाळा, कार्यालये, दवाखाने याठिकाणी असलेल्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पद्धतीने साफसफाई व स्वच्छता कामांना मंजुरी देणे, जीवन नगर ताथवडे येथील पंप हाऊस चा वीज भार उपलब्ध होण्यासाठी म.रा. वि.वि कंपनीस रक्कम अदा करणे, भामा आसखेड धरणावरील अशुद्ध जलउपसा केंद्र ते नवलाख उंब्रे ब्रेकप्रेशर टाकीपर्यंत १७०० मी.मी. व्यासाची रायझिंग मेन टाकणे व बी.पी.टी. ते चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १४०० मी.मी. व्यासाची गुरुत्व जलवाहिनी टाकणेकामी अडथळा ठरणाऱ्या उच्चदाब खांब व तारा स्थलांतरित करणे, सेक्टर २३ जलशुद्धीकरण केंद्रा जवळील म.रा.वि.वि कं. ची २२ के व्ही उपस्कर वाहिनी हटविणे, प्रभाग क्र, ११ व १३ मधील जुने गंजलेले व धोकादायक पोल बदलणे व अनुषांगिक कामे करणे, लिंकरोड चिंचवड ख्रिश्चन स्मशानभूमी, दापोडी, निगडी, दिघी मुस्लिम दफनभूमी, दिघी लिंगायत दफन भूमी येथील काळजीवाहक संस्थाना मुदतवाढ देणे, शहरातील मालमत्ता धारकांना बिले अदा करण्यासाठी नेमलेल्या महिला बचत गटांना १०% रक्कम अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच नगरसचिव विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांना रजा मंजूरी खर्चास देखील आजच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

# यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाला भेट देत आरोग्य सेवांचा घेतला आढावा



> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने नागरिक उपचारासाठी येतात. त्यामुळे रुग्णांना दर्जेदार, जलद आणि परिणामकारक आरोग्य सेवा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी तसेच नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.
>
> **- शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी आज पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण मेमोरियल (वायसीएम) रुग्णालयाला भेट देत रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी केली. यावेळी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी संपूर्ण रुग्णालयाचा सविस्तर आढावा उपमहापौर यांना दिला.

यावेळी उपमहापौर बाबर यांनी रुग्णांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची प्रकृती, सुरू असलेले उपचार तसेच रुग्णालयात मिळणाऱ्या आरोग्य सेवांबाबत माहिती घेतली. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा, उपचारांची गुणवत्ता आणि विविध विभागांतील कामकाजाची पद्धत याचीही त्यांनी पाहणी केली. रुग्णालयातील ओपीडी, आपत्कालीन सेवा, तसेच इतर महत्त्वाच्या विभागांतील उपलब्ध वैद्यकीय सुविधा आणि रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना अधिक दर्जेदार, तत्पर आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच रुग्णालयातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधत सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक सुधारणा, उपलब्ध सुविधांचा विस्तार तसेच रुग्णालयासमोरील अडचणी आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र वाबळे तसेच वायसीएम रुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# चिंचवड येथे सोमवारपासून पाच दिवसीय उत्सव

**पिंपरी (दै. संध्या) :**



श्री स्वामी समर्थ सत्संग मंडळ, चिंचवडगाव यांनी सोमवार, दिनांक १६ मार्च २०२६ पासून पाच दिवसीय श्री स्वामी समर्थ प्रकटदिन उत्सवाचे आयोजन केले आहे. बुकॉऊ वुल्फ कॉलनी, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग (पिंपरी-चिंचवड लिंक रोड), चिंचवडगाव येथील स्वामी समर्थ मठाच्या प्रांगणात सोमवार, दिनांक १६ मार्च २०२६ रोजी पहाटे ४:३० वाजता 'श्रीं'चा पंचामृत अभिषेक व पूजा आणि ६ वाजता उत्सव कलश स्थापनेने उत्सवाचा प्रारंभ होईल. सायंकाळी ६ वाजता अवधूत गांधी यांचा अफलातून गाण्यांचा कार्यक्रम होईल. मंगळवार, दिनांक १७ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता भक्तिगंधर्व मुकुंद बादरायणी आणि सहकारी स्वरसमर्थ अभंगवाणी सादर करतील. बुधवार, दिनांक १८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता योगेश तपस्वी बहारदार भक्तिगीते सादर करतील. गुरुवार, दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आशुतोष झा यांचे ऐतिहासिक शिवशंभो गाथा व्याख्यान होईल. शुक्रवार, दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त गायिका सावनी रवींद्र 'घन अमृताचा' हा सुश्राव्य गीतांचा कार्यक्रम सादर करतील. प्रकटदिन उत्सव काळात दररोज पहाटे ४:३० वाजता अभिषेक व पूजा आरती, सकाळी ८:३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत स्वामी स्वाहाकार, श्रीगुरुलीलाअमृत ग्रंथ पारायण, दुपारी १२ वाजता महानैवेद्य व आरती, भजनसेवा, कीर्तन, सामुदायिक रुद्राभिषेक इत्यादी धार्मिक विधी संपन्न होतील. शुक्रवार, २० मार्च रोजी दुपारी १२:३० ते ३ या वेळेत महाप्रसाद वाटप होणार आहे. या पाच दिवसीय प्रकटदिन उत्सव सोहळ्यातील सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचा सर्व नागरिकांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्वामी समर्थ सत्संग मंडळाचे अध्यक्ष दिनकर चिंचवडे (पाटील) यांनी केले आहे.

# महापौर यांच्या अध्यक्षतेखाली 'क' क्षेत्रीय कार्यालय येथे आढावा बैठक संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**



प्रत्येक प्रभागात मूलभूत नागरी सुविधा दर्जेदार आणि सुरळीतपणे मिळणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. योग्य दाबाने पाणीपुरवठा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, अतिक्रमणमुक्त रस्ते तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध आणि समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महापालिका शाळांमधील सुविधा अधिक सक्षम करणे, हॉकर्स झोनचे योग्य नियोजन करणे आणि 'माझी वसुंधरा' उपक्रमात शहराला अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य, अतिक्रमण, पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान, पशुवैद्यकीय आदी विभागांचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकांचे आयोजन केले जात आहे. आज नेहरूनगर येथील 'क' क्षेत्रीय कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस विधी समिती सभापती सुजाता बोराटे, माजी महापौर तथा नगरसदस्य राहुल जाधव, माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर, नगरसदस्य तुषार सहाणे, योगेश लांडगे, निखिल बोऱ्हाडे, नगरसदस्या सारिका मासुळकर, सारिका बोऱ्हाडे, नम्रता लोंढे, अश्विनी वाबळे, रेखा देवकर, उपआयुक्त प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, शहरी दळणवळण, जलनिस्सारण या विभागांचे कार्यकारी अभियंते आणि इतर संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना महापौर रवि लांडगे यांनी शहरातील मूलभूत नागरी सुविधांबाबत अधिक काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील प्रत्येक प्रभागात नागरिकांना सुरळीत व योग्य दाबाने पाणीपुरवठा होणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी संबंधित विभागांनी नियमित तपासणी करावी तसेच या उपाययोजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर नागरिकांना पाण्याचा पुरवठा ठराविक वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने मिळावा यासाठी पाण्याच्या वेळापत्रकाबाबतही योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

याशिवाय, महापौर रवि लांडगे यांनी पाणी शुद्धीकरण प्रक्रियेला अधिक सक्षम करण्यावर भर दिला. पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित तपासणी करून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शहरातील रस्त्यांवर ज्या ठिकाणी वारंवार कचरा साचतो त्या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याचे निर्देश देत अशा ठिकाणी सौंदर्यीकरण केल्यास नागरिक कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होईल, असे त्यांनी सांगितले. पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत प्रत्येक प्रभागातून कचऱ्याची ठिकाणे पूर्णपणे हटवून शहर अधिक स्वच्छ व सुबक करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचा एल्गार!

■ बारामती शहर काँग्रेस पक्षातर्फे स्वप्निल रावडे तहसिलदार बारामती यांना प्रमुख मागण्यांचे निवेदन

बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहर काँग्रेस पक्षातर्फे केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांचा आणि वाढत्या महागाईचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.पेट्रोल, डिझेल आणि गॅस टंचाईमुळे सामान्य जनता,गृहिणी आणि विद्यार्थी होरपळून निघत आहेत. यावेळी केलेल्या प्रमुख मागण्या : केलेली इंधन दरवाढ मागे घ्यावी व साठवणुकीच्या चुकीच्या नियोजनामुळे होणारी पेट्रोल-डिझेलची टंचाई त्वरित दूर करावी.गॅस सिलेंडरचे दर नियंत्रणात आणावे. घरगुती गॅस आणि व्यावसायिक गॅसच्या वाढत्या किमतींमुळे मेस चालक आणि गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. प्रशासनाने या मागण्यांची दखल न घेतल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र 'जेल भरो' आंदोलन छेडण्यात येईल,असा आंदोलनाचा इशारा देण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पदाधिकारी आकाश दादा मोरे (सचिव,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस), वीरधवलजी गाडे (सचिव,युवक काँग्रेस),ॲड.अशोक उद्धवराव इंगुळे (शहराध्यक्ष,बारामती शहर काँग्रेस),वैभवजी बुरुंगले (अध्यक्ष,बारामती युवक काँग्रेस),डॉ.विजय भिसे,रमेश बापू जगदाळे,भारत रामचंद्रे,राहुल वाबळे उपस्थित होते.



### ज्ञानदान व अन्नदान करणारा खरा पुण्यवान : डॉ.नामदेव महाराज शास्त्री

आळंदी (दैनिक संध्या) : समाजामध्ये ज्ञानदान व अन्नदान करणारा व्यक्तीच खऱ्या अर्थाने पुण्यवान ठरतो. माणूस जितके अधिक दान करतो, तितके त्याच्या जीवनात पुण्याचा संचय वाढत जातो आणि त्या पुण्याच्या बळावर त्याला आयुष्यात योग्य संधी प्राप्त होत असतात. ज्ञानाच्या माध्यमातून माणसाचे जीवन घडते, तर अन्नदानामुळे समाजातील गरजूंचे पोट भरते. त्यामुळे या दोन्ही दानांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे, असे प्रतिपादन न्यायाचार्य हभप डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांनी केले.आयेजित आळंदी येथे स्व.विमलकाकू कुऱ्हाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित भागवताचार्य सिद्राम महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून चालू असलेल्या श्रीमद्भागवत कथा सोहळ्यास त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.या प्रसंगी कुऱ्हाडे परिवाराच्या वतीने ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे व भैरवनाथ उत्सव मंडळाचे अध्यक्ष शंकरराव कुऱ्हाडे यांनी न्यायाचार्य हभप डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे स्वागत केले. नामदेव महाराज शास्त्री म्हणाले की, श्रीमद्भागवत कथा ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून ती माणसाला सदाचार, भक्ती आणि सेवाभाव शिकवणारी जीवनशाळा आहे. संत परंपरेने समाजाला भक्ती, नैतिकता आणि परस्पर प्रेमाचा संदेश दिला आहे. या परंपरेतून प्रेरणा घेऊन समाजकार्यात योगदान देणे ही काळाची गरज आहे. स्व.विमलकाकू कुऱ्हाडे यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या श्रीमद्भागवत कथा सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांकडून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



### भविष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे : नगरसेविका रुपाली धाडवे

आळंदी (दैनिक संध्या) : प्रामाणिकपणे मेहनत, शिस्त आणि सकारात्मक विचारसरणी अंगीकारल्यास जीवनात कोणतीही अडचण मोठी वाटत नाही. चांगले शिक्षण घेऊन स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहावे. भविष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन नगरसेविका रुपाली धाडवे यांनी केले. विश्वकर्मा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नगरसेविका रुपाली धाडवे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला भेट देत विविध विषयांवर त्यांची मुलाखत घेतली. या वेळी विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक तसेच राजकीय घडामोडींवर उत्सुकतेने प्रश्न विचारत दिलखुलास संवाद साधला. 'दुसऱ्यांदा नगरसेविका झाल्यानंतर प्रभागात कोणते उपक्रम राबवणार?', 'विद्यार्थ्यांसाठी कोणत्या सुविधा आणि संधी निर्माण करणार?' तसेच 'आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना भविष्यात राजकारणात यायचे असेल तर काय करावे लागेल?' असे प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले. या प्रश्नांना धाडवे यांनी मनमोकळेपणाने उत्तरे देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमध्ये समाज आणि देशाबद्दल असलेली जाणीव, नेतृत्वाची आवड आणि भविष्यासाठी असलेली स्वप्ने पाहून समाधान वाटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावणे, वेळेचे योग्य नियोजन करणे आणि समाजातील घडामोडींविषयी जागरूक राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. या संवादातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### वाघोलीत फर्निचर कारखान्याला आग; कारखाना जळून खाक, कोट्यवधीचे नुकसान

वाघोली (दैनिक संध्या) : वाघोलीतील जगताप वस्ती परिसरातील फर्निचर कारखान्याला आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये कारखाना पूर्ण जळून खाक झाला. पी एम आर डी ए व महापालिका अग्निशमन दलाच्या ७ ते ८ गाड्यांना आग नियंत्रणात आणण्यास सहा ते सात तास लागले. यामध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले.

# मंदिरात चोरी करणारी टोळी जेरबंद : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील मंदिर चोरीचे ८ गुन्हे उघडकीस : १ लाख १९ हजार रु. मुद्देमाल हस्तगत

नारायणगाव (दै. संध्या)

भाविकांनी दानपेटीत केलेले दान चोरी करणारी टोळी जेरबंद करून जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील मंदिर चोरीचे आठ गुन्हे उघडकीस आणून रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण सुमारे १,१९,०००/- रू. किं. चा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण ची धडाकेबाज कारवाई करण्यात आली आहे. आळेफाटा पो.स्टे.गु.र.नं. ५६/२०२६ भा.न्या.सं. २०२३ कलम ३३१ (४), ३०५ प्रमाणे दि. २३/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्हयातील फिर्यादी नामे शांताराम गोपाळा भुजबळ वय ६७ वर्षे धंदा शेती रा.आले चिचकाईमळा ता. जुन्नर जि.पुणे यांनी फिर्याद दिली असून, आळे गावातील खंडोबा मंदिरात दि. २३/०२/२०२६ रोजी रात्रीच्या वेळी दोन अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम, सोन्याच्या व चांदीचा मुलामा असलेले दागिने रू. २०,०००/- कि.चा मुद्देमाल चोरी करणेत आला आहे. वगैरे माचे फिर्यादीवरून



गुन्हा नोंदविणेत आला आहे.

जुन्नर, आंबेगाव तालुक्यात मागील दोन महिन्यात मंदिर चोरीचे गुन्हयांमध्ये वाढ झाली होती, त्यामध्ये आळे गावातील श्री खंडोबा मंदिर, शिरोली बु॥ येथील श्री भैरवनाथ मंदिर, नारायणगाव येथील श्री. साईबाबा मंदिर, नळवणे गावातील श्री खंडोबा मंदिर, मंचर शहरालगतचे कळंबा माता मंदिर, जुन्नर धालेवाडी येथील श्री शिवशंभू मंदिर, रांजणगाव गणपती गावाजवळील श्री सोमेश्वर मंदिर, अशा मंदिरांमधील दानपेटी फोडून रोख रक्कम व भाविकांनी केलेले दान, तसेच मंदिरातील इतर मौल्यवान साहित्य चोरी गेले होते. सध्या यात्रा, उत्सवाचा कालावधी असल्याने गावोगावी देव-देवीच्या यात्रा उत्सव साजरा केला जात आहे, अशा वेळी मंदिरांमध्ये चोरी होत असल्याने भाविक व नागरीकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली त्याचप्रमाणे मंदिर चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत नागरीकांनी मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल सो. पुणे ग्रामीण यांना संपर्क करून विनंती केली आहे. सदर गुन्हयांचा समांतर तपास करणेकामी पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी पो.नि. अविनाश शिळीमकर, स्था.गु.शा. यांचे अखत्यारीत एक तपास पथक तयार करून गुन्हे उघडकीस आणण्याचे अनुषंगाने योग्य मार्गदर्शन व सुचना केल्या होत्या. पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांनी जुन्नर व खेड विभागातोल पथकातील अधिकारी व अंमलदर यांचे समवेत सर्व गुन्ह्यांच्या घटनास्थळांना भेट दिली. पथकाला योग्य सुचना करून सीसीटीव्ही फुटेज, गुन्हे कार्यपद्धत, तांत्रिक विश्लेषणाचे आधारे तपास करणेबाबत सांगितले. स्था.गु.शा. चे पथकाने सर्व मंदिर चोरीचे गुन्ह्यातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज पडताळले असता, सर्व गुन्हयांमध्ये एकाच वर्णनाचे आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले, फुटेज गोपनीय बातमीदारांना दाखविणेत आले, दि. ०३/०३/२०२६ रोजी गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या बातमीचे आधारे आरोपी नामे १) सुनील सुरेश आगिवले वय २० वर्षे, रा. कळस खु, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, २) भिमा भाऊसाहेव गिहे वय २६ वर्ष रा. नांदूर शिंगोटे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, मुळ रा. कोतूळ ता. अकोले जि. अहिल्यानगर, यांना पुणे नाशिक हायवेवरील कांदळी फाटा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे सांगितले आहे, त्याचप्रमाणे त्यांचे कडून गुन्हा करणेसाठी वापरलेली मोटार सायकल, कटावणी, स्क्रू डायव्हर, स्प्रे, रोख रक्कम, चांदीचे पादुका असा एकूण १,१९,०००/- रू. किं.चा मुद्देमाल हस्तगत करणेत आलेला आहे.

या कारवाईत १) आळेफाटा पो.स्टे., गु.र.नं. ५६/२०२६ BNS ३३१/४), ३०५, २) आळेफाटा पोलीस स्टेशन गु.र.नं. ०२/२०२६ BNS ३३१ (४), ३०५, ३) नारायणगाव पो. स्टे., गु.र.नं. ४८/२०२६ HNS ३३१/४), ३०५, ४) रांजणगाव एमआयडीसी पो.स्टे. गु.र.नं. ३८/२०२६ BNS ३३१ (४), ३०५, ५) जुन्नर पो.स्टे. गु.र.नं. ५३/२०२६ HNS ३३१/४), ३०५, ६) मंचर पो.स्टे. गु.र.नं.६२/२०२६ BNS ३३१ (४), ३०५, ७)जुन्नर पो. स्टे. गु.र.नं. २८/२०२६ HNS ३३१(४), ३०१५, ८) संगमनेर शहर, अहिल्यानगर १३८/२०२६ BNS ३३१ (४), ३०५ हे आठ गुन्हे उघडकीस आले आहे. गुन्हयातील आरोपींना मा. न्यायालया समक्ष उपस्थित करणेत आले असून, आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, खेड उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, स्था.गु.शा.चे सपोनि महोदव शेलार, पोलीस अंमलदार दिपक साबळे, संदिप वारे, अक्षय नवले, राजु मोमीन, विक्रम तापकीर, हेमंत विरोळे, निलेश सुपेकर, समाधान नाईकनवरे, मपो हवा. सुजाता कदम यांनी केली आहे.

## ओम श्री साईराम शिक्षक प्रतिष्ठान तर्फे महिला सन्मान सोहळा संपन्न

जुन्नर (दै. संध्या)

नारायणगाव ता.जुन्नर येथील ताराई कृषी पर्यटन केंद्रात जागतिक महिला दिनानिमित्त व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधत तालुक्यातील विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे साहेब होते.यावेळी गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे,नारायणगाव लोकनियुक्त सरपंच डॉ.शुभदा वाव्हळ,शिक्षण विस्तार अधिकारी अनिता शिंदे,डॉ. पल्लवी राऊत,डॉ.केतकी काचळे,सबनीस विद्यामंदिरातील पर्यवेक्षिका अनुपमा पाटे,ॲड. भाग्यश्री नलावडे,महिला पोलीस सुमित्रा तळपे,आशा वर्कर अश्विनी वारुळे,उद्योजिका अश्विनी कोल्हे व कावेरी कोल्हे यांचा फेटा बांधून तसेच सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

## मोनिका कांबळे यांच्या मध्यस्थीने वीज पुन्हा सुरू

नीरा (दै. संध्या)

नीरा (ता. पुरंदर) – पुरंदर तालुक्यातील नीरा येथील अंगणवाड्यांचा वीजपुरवठा अचानक खंडित करण्यात आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र नव्याने निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे यांच्या मध्यस्थीने हा वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला.

सध्या वीज वितरण विभागाकडून थकीत वीजबिलांची वसुली मोहीम सुरू आहे. ज्या ग्राहकांची बिले थकीत आहेत त्यांचे वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली जात आहे. त्याचाच फटका आज नीरा येथील अंगणवाड्यांना बसला. थकीत बिलांमुळे दोन अंगणवाड्यांचे वीज कनेक्शन कट करण्यात आले होते, तर इतर अंगणवाड्यांचे कनेक्शनही कट करण्याची कारवाई सुरू होती.

वीजपुरवठा खंडित झाल्याने अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांना वाढत्या उष्णतेचा त्रास सहन करावा लागला. तसेच अंगणवाड्यांमधील डिजिटल सुविधा देखील बंद पडल्या. याबाबतची माहिती पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे यांना मिळताच त्यांनी तातडीने पुढाकार घेतला.

नीरा ग्रामपंचायतीची जुनी कार्यकारणी सध्या विसर्जित असल्याने थकीत वीजबिल नेमके कोणी भरायचे – ग्रामपंचायत की जिल्हा परिषद – असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर कांबळे यांनी गटविकास अधिकारी आणि वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा घडवून आणली. या चर्चेतून मार्ग काढत अंगणवाड्यांचा वीजपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला.

या संदर्भात वीज वितरण विभागाचे सहाय्यक अभियंता अलीम मण्यार यांनी सांगितले की, “नीरा येथील अंगणवाड्यांचे वीजबिल थकीत आहे. दोन अंगणवाड्यांचे कनेक्शन कट करण्यात आले होते आणि इतरांवरही कारवाई सुरू होती. मात्र पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे व गटविकास अधिकारी यांच्या विनंतीनंतर वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला असून पुढील कारवाई काही काळासाठी स्थगित करण्यात आली आहे.”

दरम्यान, नव्याने निवडून आल्यानंतर नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मोनिका कांबळे यांनी केलेल्या या तत्पर कामाचे नीरा परिसरात कौतुक होत आहे.

## महिला दिनानिमित्त आदिशक्ती महिला पुरस्कार सोहळा संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त श्री आदिशक्ती महिला प्रतिष्ठान, इनरव्हील क्लब नारायणगाव आणि श्री आदिशक्ती महिला पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील कर्तृत्ववान महिलांचा “आदिशक्ती महिला पुरस्कार सन्मान सोहळा ' सोमवार, दि. १० मार्च २०२५ रोजी श्री मुक्ताबाई मंगल कार्यालय, नारायणगाव येथे संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी नारायणगावचे सरपंच शुभदाताई वाव्हळ, नीताताई बोरकर, राजश्रीताई बेनके, योगिनीताई खैरे, पुष्पाताई खैरे, सुमनताई गुंजाळ, प्रांजल भुतडा, ज्योती गांधी, सुप्रिया अडसरे, बाळसराफताई, भावनाताई बेल्हेकर तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात रचना संतोष कोल्हे (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कृषीपरीक्षेमध्ये पहिल्याच प्रयत्नात राज्यात १७ आणि ओबीसी रँक ५ घेऊन कृषी उपसंचालक क्लास १ या राजपत्रित अधिकारी म्हणून निवड) तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सौ. नेहाताई योगेश पाटे, पंचायत समिती सदस्य सुषमा वाव्हळ आणि जयश्रीताई बनकर आणि लग्नानंतर शिक्षण घेऊन स्वतःला एका उंचीवर नेण्याचे काम ॲड. सौ. सुनिता चासकर, सौ. शुभांगी गुंजाळ, सौ. अश्विनी पांचाळ, सौ. सोनाली गांधी, सौ. अनिता शिंदे या पाच कर्तुत्ववान महिलांनी केले त्या महिलांचा देखील सन्मान करण्यात आला. महिलांसाठी विशेष ग्रुप डान्स, लकी ड्रॉ, डिनर सेट, रेजगाडी सेट यांसारखी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

कार्यक्रमात निवेदक दत्ता जाधव यांच्या सादरीकरणातून सुमधुर गीतांची मैफल रंगली. तसेच महिलांसाठी साडी, ड्रेस, पर्स, ज्वेलरी आदी वस्तूंची खरेदी करण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली होती. डान्समध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला विशेष गिफ्ट देण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन संस्थापिका अंजलीताई खैरे,प्रतिष्ठान अध्यक्ष रोहिणी जगदाळे, IWC अध्यक्षा समृद्धी वाजगे आणि सविता खैरे, प्रीती शहा, ॲड. सुनिता चासकर, नंदा मुथ्था,स्वाती मुदगल, सुषमा वाजगे, रश्मी थोरवे, नंदिनी घाडगे, सुनिता कोल्हे, संजीवनी वाबळे, दर्शना फुलसुंदर, आरती वायकर, वर्षा गांधी, वैशाली कसबे, शीतल जठार, गीतांजली पाटे, रुचिता वाघ, ममता तवर, स्मिता वाजगे, प्रगती नवले, संगीता बडेरा, सुजाता भुजबळ, ज्योती सोमवंशी, वर्षा तांबे, कुंदा इचके, प्रिया वाघमारे माधुरी चौधरी, सुनिता गायकवाड यांनी केले होते.



## माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस अभिवादन

शिरूर (दै. संध्या)

माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे सुसंस्कृत, दूरदृष्टीचे व अभ्यासू नेतृत्व होते. उत्तम संघटन कौशल्य, परिपक्व विचार आणि प्रभावी लेखनशैली यांमधून त्यांनी नेतृत्वाची वेगळी उंची गाठली. लेखन आणि विचार कसे असावेत, हे यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यातून शिकण्यासारखे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे माजी अध्यक्ष तसेच शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नंदकुमार निकम यांनी केले. माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ११४ व्या जयंतीनिमित्त शिरूर शहरातील यशवंतराव चव्हाण चौक (डंबेनाला), शिरूर नगरपरिषद तसेच चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बोरा महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना निकम म्हणाले, की आज समाजात सुसंस्कृतपणा कमी होत चालल्याची खंत वाटते. यशवंतराव चव्हाण हे दूरदृष्टीचे, व्यासंगी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी नाळ जुळवून घेणारे नेते होते. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीची पायाभरणी त्यांच्या नेतृत्वातून झाली. आपल्या वडिलांचे चव्हाण यांच्याशी चांगले संबंध होते आणि त्यामुळे त्यांना जवळून ऐकण्याची संधी मिळाली, असेही त्यांनी सांगितले.

# शैक्षणिक कार्याचा विस्तार आज ए.आय.च्या माध्यमातून

पुरंदर (दै. संध्या)

महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखेच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेच्या सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे होते.

या प्रसंगी बोलताना वाघीरे महाविद्यालयाच्या ए.आय. तांत्रिक विभागाच्या प्रमुख डॉ. प्रणिता शेरखाने यांनी सांगितले की, १९व्या शतकात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजात साक्षरतेची ज्योत प्रज्वलित केली. त्या काळात विशेषतः महिला साक्षरतेची मोठी गरज होती. मात्र २१व्या शतकात समाजाने कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) या नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अशी वेगवान साक्षरता आत्मसात करणे हे जागृत समाजाचे प्रमुख लक्षण ठरणार आहे.

शिक्षण, कृषी, उद्योग, व्यापार, बांधकाम अशा प्रत्येक क्षेत्रात ए.आय. तंत्रज्ञानामुळे क्रांतिकारी बदल घडत असून या माध्यमातून ही सर्व क्षेत्रे अधिक सक्षम आणि परिपूर्ण करण्याचा जणू ध्यास घेतला जात असल्याचे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

आज मोबाईलच्या माध्यमातून अनेक दैनंदिन कामे अत्यंत सहज आणि सुलभ पद्धतीने करता येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



अध्यक्षीय मनोगतात ॲड. दिलीप निरगुडे यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेल्या शिक्षणप्रबोधनाच्या कार्याचा आधुनिक काळात ए.आय.च्या माध्यमातून विस्तार होताना दिसत आहे. समाजाने या तंत्रज्ञानाचे योग्य आकलन करून त्याचा विधायक उपयोग केला तर देशाच्या प्रगतीस नवे आयाम प्राप्त होतील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषदेचे कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी करून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ए.आय. विषयाचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त असून हाच या कार्यक्रमाचा मुख्य गाभा असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास परिषदेचे उपाध्यक्ष वसंतराव ताकवले, कार्यवाह बाळासाहेब मुळीक, प्रा. डॉ. संदीप टिळेकर, प्रा. डॉ. सुभाष तळेकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी गुरुकुल ॲकॅडमी, आचार्य अत्रे प्रतिष्ठानच्या विविध शाळा, सासवड नगरपालिका शिक्षण मंडळाचे इंदिरा गांधी विद्यालय, वीर बाजी पासलकर प्रशाला आदी शाळांमधील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व शाळांना ए.आय. शिक्षणाचे मराठी चार्ट वसंतराव ताकवले यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रदीप दुर्गाडे, राजेंद्र चांदगुडे, जीवन वाटेकर, सुहास कोकाटे, दिपाली दळवी, नीलम जाधव आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन छायाचित्रकार जगदीश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप टिळेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन वसंतराव ताकवले यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## पुण्यातील नेक्सस वेस्टएंड मॉलमध्ये गुढीपाडव्या निमित्त विविध उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील औंध येथील नेक्सस वेस्टएंड मॉल मध्ये १६ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत गुढीपाडव्याचा उत्साही सण साजरा करण्यात येणार आहे. मॉलमध्ये थीमॅटिक सजावट आणि उत्सवी खरेदी आणि आनंद वाढविण्यासाठी डिझाइन केलेल्या आकर्षक उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. समृद्धी आणि नवीन सुरुवातीचे प्रतीक असलेल्या ३०० लघु गुढी ग्राहकांना वाटल्या जातील. उत्सवात डिजिटल ट्विस्ट जोडून, ग्राहक विशेषतः क्युरेट केलेल्या सेल्फी बूथवर लघु गुढीसह सेल्फी क्लिक करून, सोशल मीडियावर पोस्ट करून आणि नेक्सस वेस्टएंडला टॅग करून उत्सवी सेल्फी स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. नोंदी १८ मार्च २०२६, संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत वैध असतील आणि निवडक सहभागी आकर्षक बक्षिसांसाठी पात्र ठरतील. १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यापासून गुढीपाडवा फोटो अपॉर्च्युनिटी सेटअपसमोर भव्य लकी ड्रॉ समारंभ आयोजित केला जाईल. याव्यतिरिक्त, ₹५,००० आणि त्याहून अधिक खर्च करणाऱ्या खरेदीदारांना ग्रँड फेस्टिव्ह लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्याची आणि चांदीची नाणी, गिफ्ट हॅम्पर्स, शॉपिंग व्हाउचर आणि इतर अनेक आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळेल. या उपक्रमाचा उद्देश या शुभ सणाच्या आनंदात भर घालत उत्सवी खरेदीला प्रोत्साहन देणे आहे.

## ‘अमेरिका-इराणमधील युद्धाचा विधान भवन उडवून देण्याच्या धमकीशी संबंध आहे का?



मुंबई (दैनिक संध्या) : मुंबईतील विधानभवन,मुंबई उच्च न्यायालय,बीएसई आणि मेट्रोला बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे आल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून, या प्रकरणाची सरकारने अत्यंत गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. सध्या अमेरिका आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धाचा या धमकीशी सबंध आहे का?, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. सध्या विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असतानाच अशा प्रकारची धमकी येणे ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. औचित्याच्या माध्यमातून बोलताना वडेट्टीवार म्हणाले,हा ई-मेल कोणी पाठवला? त्यामागे कोणती शक्ती आहे? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. खलिस्तानी संघटनेचा हात असल्याची चर्चा सुरू आहे. जर अशा महत्त्वाच्या ठिकाणांना उडवून देण्याच्या धमक्या येत असतील, तर हे आपल्या गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सध्या अमेरिका आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धाचा या धमकीशी सबंध आहे का? आंतरराष्ट्रीय पातळीवर ताणले गेलेल्या संबंधांमुळे भारतात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा हा प्रयत्न असू शकतो. गृहविभागाने या प्रकरणाचा तपास करून या ई-मेलचा उगम शोधून काढावा आणि यावर तातडीने सभागृहात निवेदन करावे, अशी आग्रही मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.




## गॅस, इंधन पुरवठ्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्पष्ट भूमिका

मुंबई (दैनिक संध्या) : अमेरिका-इराण युद्धामुळे देशभरात गंभीर गॅस टंचाई निर्माण झाली असून, देशभरात गॅस सिलिंडरसाठी सर्वसामान्य नागरिकांनी भर उन्हात रांगा लावल्या. पुणे, नागपूर, मुंबई, नाशिक, कोल्हापूरमध्ये गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी सकाळपासूनच रांग लावली होती. सिलिंडर संपल्याने राज्यातील ४० टक्के हॉटेल्स बंद पडले असून, काही हॉटेलचालकांवर चूल पेटवण्याची वेळ आली. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने मात्र देशात एलपीजी सिलिंडरची कोणतीही कमतरता नसून ग्राहकांनी घाबरून जाऊन आगाऊ बुकिंग करण्याची गरज नाही, असे म्हटले आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडर काळ्या बाजारात ४ ते ५ हजारावर पोहोचला आहे. अनेक हॉटेल्सनी आपल्या मेन्यू कार्डमध्ये बदल करण्यास सुरुवात केली असून, कमी गॅस लागणाऱ्या पदार्थांवर भर दिला जात आहे. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, गॅस, इंधन पुरवठ्याबाबत केंद्र सरकार अतिशय बारकाईने आणि गांभीर्याने लक्ष देत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संपूर्ण केंद्र सरकार लक्ष ठेवून आहे. गॅसचा तुटवडा होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी गॅस पुरवठा आणि तुटवड्यासंदर्भात भूमिका मांडली. काही लोक अफवा पसरवत आहेत, पण कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नका. कुणीही अफवा पसरवू नये. नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहे, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. दरम्यान, घरगुती एलपीजीचा पुरवठा सध्या अडीच दिवसांच्या सामान्य पातळीवर स्थिर आहे. चुकीच्या माहितीमुळे काही ठिकाणी साठेबाजीचे प्रकार समोर येत आहेत, मात्र सरकार त्यावर लक्ष ठेवून असून, राज्य सरकारांना काळाबाजार रोखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारी प्रयत्नांमुळे एलपीजी उत्पादनात सुमारे २५ टक्क्यांची वाढ झाली आहे. पुढच्या काही दिवसांत एलएनजीचे दोन मोठे टैंकर भारतात पोहोचणार असून, यामुळे एलपीजी टंचाई कमी होईल, असे पेट्रोलियम मंत्रालयाने म्हटले आहे.

# आरोग्य विमाधारक केंद्रबिंदू मानून विमा कंपन्या व रुग्णालयांनी सेवा द्यावी

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर : विमाधारकांच्या तक्रारींची शासन करणार शहानिशा

मुंबई (दै. संध्या)



वैद्यकीय व्यवसायातील विश्वासार्हता वाढविणे ही शासनाची प्राथमिकता असून कोणत्याही रुग्णाला उपचार किंवा विमा क्लेम मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाइत तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व रुग्णालयांची अवाजवी वैद्यकीय बिले याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण, खासगी विमा कंपन्या व खासगी रुग्णालये यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून खासगी विमा कंपन्या व रुग्णालयाने सेवा द्यावी असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व खासगी रुग्णालयाकडून आकारली जाणारी वाजवी बिले. याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने याबाबत निश्चित कार्यपद्धती निर्धारीत करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. बैठकीस रिलायन्स, टाटा, एसबीआय, स्टार हेल्थ, एचडीएफसी, एआयजी, यासह राज्यातील प्रमुख विमा कंपन्या तसेच व्होकार्ड, लीलावती, जसलोक, रिलायन्स यासह राज्यातील प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विमा कंपनी आणि रुग्णालय व्यावसायिक पद्धतीने काम करत असली तरी रुग्ण हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विमा कंपन्या, खासगी रुग्णालये, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी एका व्यासपिठावर येऊन रुग्ण कल्याणासाठी निश्चित कार्यपध्दती निर्धारित करण्याबाबत चर्चा झाली.

आरोग्यविमा घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असुन त्यांना समाधानकारक सेवा देणे हे रुग्णालये व विमा कंपन्यांची जबाबदारी आहे. याबाबत चुकीचे निदर्शनास आल्यास शासन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरात अद्यावत वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर्स, व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे, मेडिकल टुरिझम व्यवसायाला मोठा वाव आहे. चांगली सेवा देऊन आपली विश्वासार्हता वाढवावी असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले

राज्यातील सर्व रुग्णालयांनी भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( आयआरडीए ) च्या पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे निर्देश देतानाच क्लेम मंजुरीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. हॉस्पिटल आणि विमा कंपन्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे अनेकदा रुग्णांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत आणि क्लेम प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी शासन आवश्यक ते निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.


राज्यात सध्या सुमारे सात ते आठ हजार रुग्णालये विमा सेवा देत असून काही ठिकाणी गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकरणांमध्ये बॉम्बे नर्सिंग ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मोठ्या रुग्णालयांनी उपचारांचे दर स्पष्ट करणारे दरपत्रक लावणे बंधनकारक करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. एकाच आजारासाठी विविध रुग्णालयांमध्ये वेगवेगळे दर आकारले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टँडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. तसेच विमा कंपन्या आणि रुग्णालयासाठी कॉमन ‘एम्पॅनलमेंट यंत्रणा उभारण्याबाबतही विचार सुरू असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

यावेळी मंजूर व नाकारलेले क्लेम आणि प्राप्त तक्रारी याबाबतची माहिती नियमितपणे आरोग्य विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( IRDA ) यांचेकडुन महाराष्ट्रातील तक्रारी प्राप्त करुन त्यावर अभ्यास व उपाययोजना करण्यात येणार असुन याबाबत कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरणार आहे.

## भूमी अभिलेख विभागात एक हजार अतिरिक्त पदांची निर्मिती

### नव्या आकृतिबंधाला राज्य सरकारची मंजुरी

पुणे (दै. संध्या)



राज्यातील भूमी अभिलेख विभाग तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने विभागाचा नवीन आकृतिबंध मंजूर केला असून, त्यामध्ये ९९४ नव्या पदांची भर घालण्यात आली आहे. नवीन आकृतिबंधानुसार एकूण पदांची संख्या १० हजार ६८३ झाली आहे. त्यात एक अतिरिक्त जिल्हाधिकारी, तर तीन उपजिल्हाधिकारी पदांची नव्याने निर्मिती केली आहे. राज्यातील आठही प्रादेशिक विभागांत एक अतिरिक्त जिल्हा अधीक्षक कार्यालय, तसेच संभाजीनगर प्रादेशिक विभागाचे विभाजन करून लातूर प्रादेशिक विभाग करण्यात येणार आहे. या आकृतिबंधानुसार आता शिपाई पद रद्द केले असून, ते बाह्यस्रोतांद्वारे भरण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विभागाची प्रशासकीय क्षमता वाढण्याबरोबरच नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक जलद आणि प्रभावी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पुण्यात प्रीमियम घरांकडे वाढता कल

पुणे (दै. संध्या)

‘गोयल गंगा डेव्हलपमेंट्स’चे संचालक अनुराग गोयल यांच्या मते, ही स्थिती व्यापक आर्थिक पायाभूत सुविधांशी जोडलेली आहे. सार्वजनिक भांडवली खर्च आणि खासगी क्षेत्राचा सहभाग यांच्या समन्वयामुळे देशातील रिअल इस्टेट विकासाचा पाया भक्कम झाला आहे. पुण्याच्या पायाभूत विस्तारामुळे (मेट्रो कॉरिडॉर, रिंग रोड प्रकल्प आणि औद्योगिक विविधता) ग्राहक मोठ्या प्रमाणावर पुण्याकडे आकर्षित होत आहेत.

हवेली तालुका आणि महानगरपालिका क्षेत्रासह मध्य पुण्याने एकूण नोंदणीमध्ये ६७ टक्के वाटा उचलला आहे. हिंजवडी आणि मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील रोजगाराच्या संधींमुळे पश्चिम पुण्याचा वाटा १६ टक्के राहिला आहे. पुण्याचा हा विस्तार शहराच्या बहुकेंद्रित वाढीचा नमुना दर्शवतो; जिथे प्रत्येक सूक्ष्म-बाजाराची स्वतःची स्वतंत्र मागणी आहे.

चालू वर्षाच्या सुरुवातीला पुण्याच्या निवासी गृहनिर्माण क्षेत्राचा कल स्पष्टपणे प्रीमियम (उच्च श्रेणीतील) घरांकडे झुकलेला दिसत आहे. आकडेवारीनुसार, मोठ्या आणि मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मालमत्तांची मागणी सातत्याने वाढत आहे. जानेवारी २०२६ मध्ये १४,५२७ मालमत्तांची नोंदणी झाली, त्यातून ६०९ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क महसूल मिळाला. व्यवहारांच्या संख्येत १७ टक्क्यांनी घट झाली असली, तरी महसुलात मात्र केवळ पाच टक्के घट झाली आहे. यावरून शहरात उच्च मूल्याच्या व्यवहारांचे प्रमाण वाढल्याचे स्पष्ट होत आहे.

एक कोटी ते २.५ कोटी रुपयांदरम्यानच्या घरांच्या श्रेणीने एकूण नोंदणीमध्ये १४ टक्के हिस्सा मिळवला आहे. एक कोटी रुपयांपर्यंतच्या घरांचा हिस्सा ८२ टक्के असून, तो पूर्वीच्या तुलनेत किंचित कमी झाला आहे. विशेष म्हणजे ५०० ते ८०० चौरस फूट आकाराच्या घरांनी ४६ टक्के व्यवहारांवर पकड मिळवली आहे. ५०० चौरस फुटांपेक्षा लहान घरांचे प्रमाण २३ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. यावरून ग्राहकांची पसंती आता उत्तम कनेक्टिव्हिटी असलेल्या ठिकाणांमधील मोठ्या घरांना असल्याचे दिसून येते.

‘तीर्थ रिॲल्टीज’चे व्यवस्थापकीय संचालक विजय रौंदळ म्हणाले ‘पुणे रिअल इस्टेट बाजार आता परिपक्व झाला आहे. आजचा खरेदीदार केवळ घर शोधत नसून संपूर्ण जीवनशैलीचा अनुभव शोधत आहे. विचारपूर्वक केलेली रचना, दर्जेदार बांधकाम आणि सामाजिक पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या प्रकल्पांसाठी ग्राहक प्रीमियम किंमत मोजायला तयार आहेत. या गरजा ओळखून जे विकासक पूर्तता करतील ते यशस्वी होतील. पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहणाऱ्यांना ग्राहकांच्या गरजा पूर्ण करताना संघर्ष करावा लागेल,’ असे रौंदळ यांनी नमूद केले.

## पिंपरी मंडईसमोरील महापालिकेच्या जागेची कागदपत्रे गायब?

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी भाजी मंडई परिसरातील जागा महापालिकेच्या मालकीची आहे. या जागेची माहिती नगररचना विभागाकडे मागितली आहे.
**- सीताराम बहुरे, उपायुक्त, भूमी व जिंदगी विभाग, महापालिका**

पिंपरी बाजारातील जागेबाबत भूमी व जिंदगी विभागाने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेतला जाईल. त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली जाईल.
**- संदेश खडतरे, सहसंचालक, नगररचना विभाग, महापालिका**

पिंपरी येथील लाल बहादूर शास्त्री भाजी मंडईच्या समोरील महापालिकेचे पार्किंग, पिंपरी पोलिस चौकी आणि पिंपरी रेल्वे स्थानकाबाहेरील फळबाजार ते मुख्य बाजारपेठ रस्त्यादरम्यान असलेल्या मोकळ्या जागेची कागदपत्रेच महापालिकेकडे उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही जागा महापालिकेच्या मालकीची असल्याचे सांगितले जात असले, तरी संबंधित कागदपत्रे मिळत नसल्याने खळबळ उडाली आहे. या मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या माफियामार्फत येथे बेकायदा दुचाकी पार्किंग सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्याचा मोठा भाग व जागा हडपल्याची तक्रार व्यापाऱ्यांकडून होत आहे. महापालिकेच्या भूमी व जिंदगी विभागाने या जागेची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. संबंधित जागेची मालकी, आराखडे व कागदपत्रांबाबत नगररचना विभागाकडे माहिती मागविण्यात आली आहे. मात्र, त्या विभागाकडून आवश्यक सहकार्य मिळत नसल्याचे भूमी व जिंदगी विभागातील कर्मचाऱ्याने सांगितले.

या जागेच्या काही भागात सध्या पोलिस चौकीही कार्यरत आहे. परिसरात फळबाजार आणि इतर व्यावसायिक दुकाने सुरू आहेत. येथे शहरातील मध्यवर्ती बाजारपेठ असल्याने या जागेला महत्त्व आले आहे. त्यामुळे जागेच्या मालकीचे व कागदपत्रांचे सत्य स्पष्ट करणे महापालिकेसाठी आवश्यक ठरत आहे. पिंपरी भाजीमंडई परिसरातील ही जागा महापालिकेचीच असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पुढील कारवाईत अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## फ्लॅटमध्येच थाटला बनावट नोटांचा छापखाना

चंद्रपूर (दै. संध्या)

शहरातील दुर्गापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका अपार्टमेंटमध्ये तब्बल ९१ लाखांच्या बनावट नोटांचा साठा स्थानिक गुन्हे शाखेला आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी शुभम दिनेश नागर (२६ वर्ष, रा. पंचेड, जि. रतलाम, मध्य प्रदेश) याला अटक केली असून घटनास्थळावरुन कलर प्रिंटर, ५०० रुपयांच्या बनावट नोटा व साहित्य जप्त केले आहे. १० मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगवर असताना ऊर्जानगर मेजर गेटजवळील राजश्री अपार्टमेंटमधील फ्लॅट नंबर २०३ मध्ये काही इसम ५०० रुपयांच्या बनावट नोटा तयार करत असल्याची माहिती मिळाली. या आधारावर पोलिसांनी तातडीने सापळा रचून धाड टाकली. परंतु, फ्लॅटला कुलूप लावले होते. पोलिसांनी फ्लॅटचे लॉक तोडले असता बेडरूममध्ये १० पुठ्यांचे बॉक्समध्ये भारतीय चलनाच्या हुबेहूब दिसणाऱ्या ५०० च्या रंगीत छायांकित नोटा होत्या. यासोबतच एक कलर प्रिंटर आणि इतर साहित्य असा एकूण ९१ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. महिनाभरापूर्वी फ्लॅट मालक सुमित कालीपथ पॉलने हा फ्लॅट मध्य प्रदेशातील काही लोकांना भाड्याने दिला होता. पोलिसांनी शुभम नागर याला ताब्यात घेतले असता फसवणुकीच्या उद्देशाने या नोटा तयार केल्याचे समोर आले. त्यावरून दुर्गापूर पोलिस ठाण्यात बीएनएसच्या कलम ३१८, ३३६, १८२ अन्वये गुन्हा नोंदवला.

# पीडीए स्टेंटिंगद्वारे नवजात बाळाला नवे जीवन

### नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलची यशस्वी कामगिरी

मुंबई (दै. संध्या)



मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलने अत्यंत गुंतागुंतीच्या हृदय हस्तक्षेप प्रक्रियेद्वारे जन्मजात हृदयदोष असलेल्या पाच दिवसांच्या नवजात बाळाचे प्राण वाचवण्यात यश मिळवले. डॉक्टरांच्या पथकाने पीडीए (पेटंट डक्टस आर्टेरिओसस) स्टेंटिंग ही अत्याधुनिक प्रक्रिया करून बाळाला नवजीवन दिले.

नवजात बाळाला त्वचेवर तीव्र निळसरपणा (सायनोसिस) दिसत असल्याने महाराष्ट्रातील एका लहान शहरातील बालरोगतज्ज्ञांकडे नेण्यात आले. तपासणीत बाळाच्या रक्तातील ऑक्सिजनची पातळी केवळ ६५ टक्के असल्याचे आढळले. गंभीर सायनोटिक जन्मजात हृदयदोषाचा संशय आल्याने स्थानिक डॉक्टरांनी तात्काळ मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या तज्ञांशी संपर्क साधत आपत्कालीन रेफरलची व्यवस्था केली. बालहृदयरोग तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार, बाळाला रुग्णवाहिकेतून हलवण्यापूर्वी प्रोस्टाग्लँडिन E1 हे जीवनरक्षक औषध देण्यात आले. सुमारे १२ तासांच्या प्रवासानंतर बाळाला सुरक्षितपणे मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. सखोल तपासणीत बाळाला फुफ्फुसीय ॲट्रेसिया, वेंट्रिक्युलर सेप्टल दोष आणि लहान पेटंट डक्टस आर्टेरिओसस (PDA) असल्याचे निदान झाले. या स्थितीत हृदयाच्या उजव्या बाजूने फुफ्फुसांकडे जाणारी सामान्य धमनी विकसित झालेली नसते. गर्भावस्थेतील नैसर्गिक रचनेतील PDA मार्गे रक्तप्रवाह होत असल्याने बाळ तात्पुरते जिवंत राहिले होते. मात्र जन्मानंतर काही दिवसांत हा मार्ग बंद होण्याची शक्यता असल्याने तातडीचा हस्तक्षेप आवश्यक होता.

कार्डियाक तज्ज्ञांच्या पथकाने कार्डियाक कॅथेटेरायझेशन लॅबमध्ये पीडीए स्टेंटिंग ही प्रक्रिया केली. सुमारे एक तास चाललेल्या या प्रक्रियेत PDA मध्ये छोटा स्टेंट बसवण्यात आला. त्यामुळे फुफ्फुसांमध्ये अखंड रक्तप्रवाह सुरू झाला आणि बाळाची ऑक्सिजन पातळी त्वरित स्थिर झाली.

उपचारानंतर बाळाची प्रकृती झपाट्याने सुधारली आणि पाच दिवसांनी त्याला स्थिर अवस्थेत घरी सोडण्यात आले. पुढील सहा ते आठ महिन्यांत सुधारात्मक हृदय शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या प्रकरणाबाबत माहिती देताना डॉ. सुप्रतिम सेन म्हणाले, “नलिकांवर अवलंबून असलेल्या हृदयदोषांमध्ये वेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. लवकर निदान, त्वरित वैद्यकीय स्थिरीकरण आणि वेळेवर हस्तक्षेप यामुळेच जीव वाचू शकतो. या प्रकरणात स्थानिक बालरोगतज्ज्ञ, वाहतूक पथक आणि आमच्या हृदयरोग विभागातील समन्वयामुळे नवजात बाळाचे जीवन वाचवणे शक्य झाले.”

नवजात बालकांमध्ये पीडीए स्टेंटिंग ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया मानली जाते, कारण रुग्ण केवळ काही दिवसांचा असतो आणि वजन ३.५ किलोग्रॅमपेक्षा कमी असते. गेल्या काही वर्षांत नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमधील बालहृदयरोग तज्ज्ञांनी सुमारे ५० पीडीए स्टेंटिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या असून त्याचे परिणाम अत्यंत समाधानकारक असल्याचे रुग्णालयाने सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## दि माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी सुनेत्रा अजित पवार यांची निवड

बारामती (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील दि माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या रिक्त झालेल्या चेअरमन पदी सुनेत्रावहिनी अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी उपाध्यक्षा संगीता कोकरे, ज्येष्ठ संचालक बाळासाहेब तावरे,सर्व संचालक, कार्यकारी संचालक अशोक पाटील आदीसह ऊस उत्पादक शेतकरी, सभासद,अधिकारी,कामगार उपस्थित होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वैभव नावडकर यांनी काम पाहिले.

## गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करा : महापौर यांच्या प्रशासनाला सुचना

पुणे (दैनिक संध्या) : शहरात गॅस सिलेंडरचा कोणत्याही प्रकारे काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कडक कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिल्या. गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेताना त्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शहरातील परिस्थितीची माहिती घेतली. महापौर नागपुरे यांनी घेतलेल्या आढाव्यानुसार पुणे शहरात गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत सुरू असून दररोज सुमारे १० हजार सिलेंडरचे वितरण नियमितपणे करण्यात येत आहे. शहरातील सुमारे ८५ टक्के सिलेंडर बुकिंग ओटीपी प्रणालीद्वारे होत असून गॅस कंपन्यांकडून २५ दिवसांच्या नियमानुसार वेळेत डिलिव्हरी दिली जात आहे. गॅस वितरण कंपन्यांच्या समन्वयातून नागरिकांना नियमितपणे गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्यात येत असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच घाबरून जाऊन सिलेंडरची अनावश्यक साठेबाजी करू नये, असे आवाहनही नागपुरे यांनी केले. गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून पुरवठा व्यवस्थेवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा; अफवांवर विश्वास ठेवू नका : जिल्हाधिकारी यांचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा पुरवठा नियमितपणे सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व एलपीजी वितरक तसेच तेल कंपन्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार घरगुती गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. नागरिकांना नियमितपणे गॅस सिलेंडरचा पुरवठा होत असून कोणतीही टंचाई निर्माण झालेली नाही. जिल्हा प्रशासन व जिल्हा पुरवठा विभागामार्फत सर्व गॅस एजन्सींवर सतत देखरेख ठेवण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय फिरती व दक्षता पथके गठित करण्यात आली आहेत. कोणत्याही वितरकाकडून कृत्रिम टंचाई निर्माण करणे, जादा दराने विक्री करणे किंवा इतर अनियमितता आढळल्यास संबंधितांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.तसेच हॉस्पिटलसारख्या अत्यावश्यक सेवांना तसेच विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांना गॅस सिलेंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्यात यावा, अशा सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

## सिलेंडर पुरवठा सुरुळीत आहे ,नागरिकांनी घाबरुन जाऊ नये - पाषाणकर गॅस एजन्सी




लोणी काळभोर (दैनिक संध्या) : लोणी काळभोर येथे गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध होत असुन ग्राहकांनी घाबरून गर्दी करु नये. असे लोणी काळभोर येथील पाषाणाकर गॅस एजन्सी तर्फे सांगण्यात आले.महाराष्ट्रात इराण-इस्राएल युद्धामुळे गॅस तुटवड्याच्या अफवांमुळे नागरिक घाबरले आहेत . पण कंपन्या आणि प्रशासनाने घरगुती सिलेंडर मुबलक असल्याचे सांगितलेआहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाला असल्याची माहिती नागरिकांच्यात होती . ज्यामुळे काही ठिकाणी नागरिकांनी गर्दी करुन अफवा पसरविण्यात आल्या गॅस कंपन्यांनी स्पष्ट केले की घरगुती वापरासाठी साठा पुरेसा आहे आणि अफवांवर विश्वास ठेवू. याबाबत लोणी काळभोर येथील पाषाणाकर गॅस एजन्सी कडुन सांगण्यात आले की ग्राहकांनी आवश्यकतेनुसारच सिलेंडर बुक करा.गॅस वितरकाशी संपर्क साधा .बुकींग करुन ओटीपी दाखवून सिलेंडर घेऊन जावा .होम डिलिव्हरी सुद्धा चालू आहे. सिलेंडर पुरवठा संध्याकाळी उशिरा पर्यंत चालू असुन नाही मिळाला तर ऑफिसमध्ये येऊन संपर्क साधण्याचे आवाहन पाषाणकर गॅस एजन्सी तर्फे करण्यात आले.याबाबत प्रशासनातील वरिष्ठअधिकाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की आम्ही पुरवठा अधिकारी आणि अन्न धान्य वितरण अधिकारी यांना सांगितले आहे की आपल्या कडे मुबलक सिलेंडर साठा असुन सिलेंडरची टंचाई सध्यातरी नाही . त्यामुळे नागरिकांनी विनाकारण उन्हात उभे राहुन टंचाई भासवण्याची गरज नाही .बुकिंग करणाऱ्याला व ओटीपी दाखवणाऱ्याला सिलेंडर मिळणार आहे .उगाच घरात साठा करु नये .कालपासूनच गॅस कंपन्याचे सिलेंडर भरण्याचे काम चालू झाले आहे .त्यामुळे टंचाई येण्याची सध्या तरी तशी परिस्थिती नाही.

## शिवनेर भूषण श्री. विनायक खोत सर यांचा सेवानीवृत्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

जुन्नर (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर निष्ठेने कार्य करणारे आदरणीय शिवनेर भूषण श्री. विनायक खोत सर यांच्या सेवानीवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पिंपळवंडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल, खामगाव (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे अनेक वर्षे प्रामाणिकपणे शैक्षणिक सेवा बजावून विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या खोत सरांनी आपल्या कार्यकाळात शिक्षणासोबतच समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. या भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. डॉ. सचिन जोशी सर (सदस्य, गड किल्ले समिती महाराष्ट्र शासन व प्रख्यात अभ्यासक) उपस्थित होते.

# ग्रामीण महिला उद्योजकतेचा भव्य उत्सव

### “मिनी सरस सावित्री जत्रा २०२६” उत्साहात संपन्न



नाझरे सुपे (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषद तर्फे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्या नियोजनातून आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन “मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६” हा पाच दिवसीय महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ग्रामीण स्वयंसहाय्यता समूहांच्या कष्ट, कौशल्य आणि उद्योगशीलतेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देत महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश देणारा हा उपक्रम ठरला.

या जत्रेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी खासदार मेधा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच स्वयंसहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देत विविध बँकांच्या माध्यमातून ४० कोटी रुपयांच्या कर्ज धनादेशांचे वितरण करण्यात आले.

या प्रदर्शनामध्ये एकूण १०० स्टॉल्स व १५१ स्वयंसहाय्यता समूहांनी सहभाग नोंदवला, ज्यामध्ये ग्रामीण महिलांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती उद्योग, पारंपरिक खाद्यपदार्थ तसेच विविध नाविन्यपूर्ण उत्पादने मोठ्या उत्साहात सादर करण्यात आली.

पुणेकरांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देत महिलांच्या उत्पादनांना भरभरून प्रतिसाद दिला. या पाच दिवसीय प्रदर्शनामध्ये सुमारे 52 लाख रुपयांची विक्री झाली असून जवळपास 10 लाख रुपयांच्या ऑर्डर्सही प्राप्त झाल्या, ज्यामुळे ग्रामीण महिलांच्या उद्योगांना नवसंजीवनी मिळाली आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ मिळाले.

समारोप कार्यक्रमास डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी माननीय उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी विभागीय उपायुक्त (विकास) प्रांजल शिंदे उपस्थित होते. विभागीय आयुक्तांनी प्रदर्शनातील विविध स्वयंसहाय्यता समूहांच्या स्टॉलना भेट देत महिलांशी संवाद साधला, त्यांच्या उत्पादनांची माहिती घेतली आणि काही उत्पादने स्वतः खरेदी करून महिला उद्योजकांना प्रोत्साहन दिले.

समारोप प्रसंगी पाच दिवसांच्या कालावधीत सर्वाधिक विक्री करणारे स्वयंसहाय्यता समूह, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे समूह तसेच सुशोभित व स्वच्छ स्टॉल सादर करणारे स्वयंसहाय्यता समूह यांना माननीय विभागीय आयुक्तांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

तसेच या प्रदर्शनात सहभाग नोंदविलेल्या सर्व स्वयंसहाय्यता समूहांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या पाच दिवसीय जत्रेला सांस्कृतिक रंगतही लाभली. ऋतुजा इंगवले (मिस महाराष्ट्र २०२०) यांच्या माध्यमातून “खेळ पैठणीचा” या आकर्षक उपक्रमासह विविध मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच आंबेगाव, बारामती, जुन्नर, वेल्हे, शिरूर, खेड व इंदापूर तालुक्यातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यामध्ये लेझीम नृत्य, पारंपारिक नृत्य, मंगळागौर, भजन, भावगीत तसेच इतर लोकसांस्कृतिक व मनोरंजनपर कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यामुळे या जत्रेला ग्रामीण संस्कृतीची समृद्ध झलक लाभली.

या प्रदर्शनाला भोर–राजगड–मुळशी मतदारसंघाचे आमदार शंकरभाऊ मांडेकर, आमदार बापूसाहेब पठारे तसेच विविध आजी-माजी पुणे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधींनी भेट देत स्वयंसहाय्यता समूहांच्या स्टॉलना भेट दिली आणि महिलांच्या उद्योगशीलतेचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले.

ग्रामीण महिलांच्या कष्ट, जिद्द आणि उद्योगशीलतेला व्यापक मंच उपलब्ध करून देणारी “मिनी सरस – सावित्री जत्रा” ही केवळ विक्री व प्रदर्शनाची संधी नसून महिला सक्षमीकरण, स्वावलंबन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी प्रेरणादायी चळवळ ठरली आहे.



## यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेस भवनात आदरांजली

पुणे (दै. संध्या)

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

या प्रसंगी माजी आमदार दिप्ती चौधरी, द. स. पोळेकर, संजय मोरे, प्राची दुधाणे, प्रियंका मधाळे, अनिता धिमधिमे, सुंदर ओव्हाळ, राज अंबिके, रमेश सोनकांबळे, लतेंद्र भिंगारे, सुरेश चौधरी, देवीदास लोणकर, हेरॉल्ड मॅसी, खुशाल चव्हाण, नितीन वायदंडे, सुरेश नांगरे, आकाश ढवळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थितांनी यशवंतराव चव्हाण यांच्या संयुक्त महाराष्ट्र निर्मितीतील योगदानाची आठवण करून त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

## ठाण्यात ‘मॉडेल करिअर सेंटर' व 'लाईट हाऊस' कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

भिवंडी (दै. संध्या)




तरुणांना रोजगाराच्या आधुनिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी ठाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि 'लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'मॉडेल करिअर सेंटर (MCC) ठाणे लाईट हाऊस कौशल्य विकास केंद्राचे' उद्घाटन आज उत्साहात संपन्न झाले. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.) यांच्या हस्ते या केंद्राचे अधिकृत लोकार्पण करण्यात आले.

या सोहळ्याला जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अनिल सदाफुले, जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या श्रीमती संध्या साळुंके, लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशनचे चेअरमन डॉ. गणेश नटराजन, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुजा के. बन्सल, मुख्य प्रकल्प अधिकारी अमृता बहुलकर आणि सहसंचालक अतुल माने प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी बदलत्या पिढीच्या मानसिकतेवर भाष्य केले. ते म्हणाले की, "पूर्वी पिढी बदलण्यासाठी २५-३० वर्षांचा काळ लागायचा, मात्र आता अवघ्या १०-१५ वर्षांतच वैचारिक तफावत जाणवू लागली आहे. आजच्या तरुणाईमध्ये अध्यात्माकडे कल वाढताना दिसत आहे, ही सकारात्मक बाब आहे. मात्र, बदलत्या काळात केवळ पदवी असून चालणार नाही, तर बाजारातील मागणीनुसार स्वतःला अपडेट ठेवणे ही काळाची गरज आहे."

जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी विविध आधुनिक अभ्यासक्रमांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. कौशल्य विकास केंद्रामध्ये ई-व्हेईकल (e-Vehicles) व ड्रोन तंत्रज्ञान, ग्राफिक डिझायनिंग व डिजिटल मार्केटिंग, लॅपटॉप रिपेअरिंग व ऑफिस एक्झिक्युटिव्ह, पर्सनल ट्रेनर व न्यूट्रिशनिस्ट (पोषणतज्ज्ञ) या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी उदाहरण दिले की, आज मोठ्या रुग्णालयांमध्ये न्यूट्रिशनिस्ट आणि फिजिओथेरपिस्टना मोठी मागणी आहे. केवळ पदवी नसली तरी योग्य कौशल्य (Skills) आणि कामाप्रती प्रामाणिकपणा असेल, तर युवक उत्तम पॅकेज मिळवू शकतात.

या केंद्राची उभारणी 'शासकीय-खाजगी भागीदारी' (PPP Model) अंतर्गत करण्यात आली आहे. मराठवाडा एक्सलरेटर फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंग (MAGIC) सारख्या यशस्वी उपक्रमांचा संदर्भ देत त्यांनी ठाण्यातील या केंद्राच्या यशाबद्दल विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमादरम्यान एका विशेष पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या श्रीमती संध्या साळुंके यांनी केले.

## अद्विक, प्रथमेश, सौरभ संयुक्त आघाडीवर महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धा

पुणे (दै. संध्या)




अद्विक अगरवाल, प्रथमेश शेरला, सौरभ म्हामणे, अनिरुद्ध लिमये, स्नेहा घाटपांडे यांनी महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेत तिसऱ्या फेरीअखेर खुल्या गटात तीन गुणांसह संयुक्त आघाडी मिळवली आहे. पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेला आज, गुरुवारपासून सुरुवात झाली. पुणे जिल्हा चेस सर्कलच्या सहकार्याने होणारी ही स्पर्धा लॉ कॉलेज रोडवरील भांडारकर इन्स्टिट्यूटमध्ये सुरू आहे. स्पर्धेचे उद्घाटन बुद्धिबळ क्रीडा ट्रस्टचे संस्थापक व्यवस्थापकीय विश्वस्त आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ मंडळाचे उपाध्यक्ष प्रकाश कुंटे, महाराष्ट्र बुद्धिबळ असोसिएशनचे उपाध्यक्ष आणि पुणे महापौर चषक स्पर्धेचे स्पर्धा संचालक राजेंद्र कोंडे, चीफ आर्बिटर राजेंद्र शिदोरे, उपमुख्य पंच पवन राठी, पवन कातकडे यांच्या उपस्थितीत झाले.

निकाल : खुला गट - तिसरी फेरीत - अलौकिक सिंहा (२) पराभूत वि. अद्विक अगरवाल (३), श्रेयस हापसे (२) पराभूत वि. प्रथमेश शेरला (३), मिहीर सरवदे (२.५) बरोबरी वि. अभिजित जोशी (२.५), केविन डीसूझा (२.५) बरोबरी वि. तन्वी कुलकर्णी (२.५), सौरभ म्हामणे (३) वि. वि. ज्ञानेश्वर चाकवे (२), निमिता जोशी (२) पराभूत वि. अनिरुद्ध लिमये (३), चंद्रकांत डोंगरे (२.५) बरोबरी वि. भुवन शितोळे (२.५), स्नेहा घाटपांडे (३) वि. वि. लक्ष्मण खुडे (२), विक्रम कोकणे (२) पराभूत वि. आरुष डोळस (३), धनाजी काकडे (२) पराभूत वि. श्लोक माळी (३), श्रावणी उंडळे (३) वि. वि. अथर्व शितोळे (२), रघुबर त्यागी (२.५) बरोबरी वि. मिलिंद सामंत (२.५), गायत्री शितोळे (२) पराभूत वि. हेरंब भागवत (३), ख्याती चिराग (२.५) बरोबरी वि. रोहित थिटे (२.५).

१९ वर्षांखालील गट - पार्थ मोघे (२) पराभूत वि. मानसी टिळेकर (३), सुयोग वाडके (३) वि. वि. राजवीर यादव (२), वेदान्त कुरुम (२.५) बरोबरी वि. आर्ष कुलकर्णी (२.५), श्रुती भेनकी (१) पराभूत वि. विशाल देवडे (३), सचिन पवार (१) पराभूत वि. गनक देशपांडे (२), ऋग्वेद सरगर (२) वि. वि. वंशिका घाळे (१).

१७ वर्षांखालील गट - अनुष्का कुतवळ (२.५) बरोबरी वि. मार्मिक शाह (२.५), अक्षज पाटील (३) वि. वि. राकेश मथियाझागन (२), अनुष्का गांधी (३) वि. वि. प्रतिती खंडेलवाल (२), अर्णव कदम (२) वि. वि. सर्वेष धुमाळ (१), अदिती कुलकर्णी (१) पराभूत वि. विराज सराफ (२), अथर्व जावळी (२) वि. वि. यश खोडे (१).

## अबॅकस स्पर्धेत ओम पुंडलिक हेंडगे प्रथम

*गुरुकुल विद्या मंदिरच्या विद्यार्थ्याचे उज्वल यश*

शिरूर (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कारेगाव येथील विद्यार्थी ओम पुंडलिक हेंडगे याने अबॅकस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ब्रह्मचैतन्य एज्युकेशन सोसायटी संचलित गुरुकुल विद्या मंदिर, करेगाव (ता. शिरूर, जि. पुणे) येथील इयत्ता तिसरी ‘अ’ मध्ये शिकणाऱ्या ओमने वार्षिक आंतरशालेय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे तसेच पालकांचे नाव उज्ज्वल केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय स्पर्धांमध्ये विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अबॅकस लेव्हल – २ या प्रकारात ओम हेंदगे याने उत्कृष्ट वेग व अचूकता दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. अबॅकस ही गणिती कौशल्य वाढवणारी स्पर्धा असून त्यामध्ये विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता आणि गणिती क्षमता विकसित होते. ओमने कठोर सराव व मेहनतीच्या जोरावर हे यश मिळविले आहे. ओमच्या या यशाबद्दल गुरुकुल विद्या मंदिरचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक क्षेत्रातही तो यशस्वी होवो, अशा शुभेच्छा देण्यात आल्या. ओमच्या यशामुळे शाळेसह कारेगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यांच्या या यशाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले असून भविष्यातही विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उत्तुंग यश संपादन करण्याचा त्याचा निर्धार असल्याचे सांगितले.

# लोणावळा–पुणे सायकलिंग स्पर्धेचा बक्षीस समारंभ संपन्न

पुणे (दै. संध्या)




यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त संजय बालगुडे मित्र परिवारतर्फे आयोजित लोणावळा–पुणे सायकलिंग स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या वेळी काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी उपस्थितांना संबोधित करताना सायकलिंगचे महत्त्व अधोरेखित केले. “मेट्रो शहरातील यांत्रिक जीवनात सायकलिंग हे शारीरिक आरोग्यासाठी वरदान आहे. सायकलिंगमुळे मन आणि शरीर दोन्ही तंदुरुस्त राहतात,” असे तिवारी यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालवडकर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब बालवडकर होते. तिवारी पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वाची खाती सांभाळत देशसेवेत मोठे योगदान दिले. त्यांचा कार्यकाल आजही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच गेली ३७ वर्षे सातत्याने या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल संजय बालगुडे यांचे त्यांनी कौतुक केले. स्पर्धेचे संयोजक व काँग्रेसचे सरचिटणीस संजय बालगुडे यांनी उपस्थितांचे स्वागत करत पुढील वर्षी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन स्पर्धेचे अंतिम गंतव्य भक्ती–शक्ती स्मारक असेल, अशी माहिती दिली. या सायकल स्पर्धेत सुमारे ३२ सायकलपटूंनी सहभाग घेतला. लोणावळा येथून काँग्रेस अध्यक्ष अतुल गवळी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या वेळी नगरसेवक आशिष गवळी, सुधीर शिर्के, मोहन औरंगे, प्रकाश रावडे, आकाश परदेशी आदी उपस्थित होते.

### सिद्धेश पाटील प्रथम

सुमारे ६५ किमी अंतराच्या जुन्या मुंबई–पुणे मार्गावर झालेल्या स्पर्धेत सुरुवातीला आयन तांबोळी, वेदांत कुलकर्णी आणि उमेश वंजारा यांनी आघाडी घेतली. तळेगावनंतर सिद्धेश पाटील, आयन तांबोळी आणि हनुमान चोपडे आघाडीवर होते. अखेर सिद्धेश पाटील यांनी आघाडी कायम ठेवत १ तास १८ मिनिटांत ६५ किमी अंतर पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकावला. हनुमान चोपडे द्वितीय तर आयन तांबोळी तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. स्पर्धेच्या आयोजनात संजय गवळी, गणेश गवळी, मंगेश बालगुडे, हेमंत मिंढे यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व काँग्रेस पदाधिकारी अनंता गांजवे, भोला वांजळे, नंदकुमार पापळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन भोला वांजळे यांनी मानले.

### स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके

प्रथम क्रमांक : ₹११,००० व प्रशस्तिपत्रक
द्वितीय क्रमांक : ₹७,००० व प्रशस्तिपत्रक
तृतीय क्रमांक : ₹३,००० व प्रशस्तिपत्रक
इतर ५ स्पर्धकांना उत्तेजनार्थ ₹५०० व प्रशस्तिपत्रक देण्यात आले.